२४ ऑगस्ट १९६८ । चाळीस पैसे

# माणूस

## मी आज ऋणमुक्त आहे



'मी आज ऋणमुक्त आहे' असे चिनी नागरिक म्हणू शकतो. हे भाग्य आम्हांला अद्याप लाभलेले नाही, स्वतंत्र होऊन वीस वर्षे उलटली तरी. या विरोधी परिस्थितीची चर्चा प्रा. के. एन्. राज यांनी आपल्या अभ्यासपूर्ण लेखात या अंकी केली आहे. (पृ. २० ते ३८)

ही चर्चा 'रटाळ' आहे ही एका वाचकाची तक्रार रास्त असेलही. पण जो विषय गेले कित्येक महिने सलगपणे व सातत्याने 'माणूस'मधून मांडला जात आहे, त्याच्या सर्व बाजू निखालसपणे वाचकांसमोर येणे अवश्य असल्याने हा लेख येथे हेतुपूर्वक पुनर्मुद्रित केला आहे.

—संपादक

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : तेरावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. १ ऑगस्ट ६८

'रूपवती भार्या शत्रू: !' ही उत्कंठा वाढविणारी लेखमाला आवडली. 'गुन्हाळ' प्रतिअंकी सरस ठरते. दिल्लीच्या दरबाराची खबर का येत नाही ? विजय तेंडूलकरांना धन्यवाद.

अरुण अग्निहोत्री, दादर

स. न. ६ ऑगस्ट ६८

मी 'माणूस'चा नियमित वाचक तथा अभ्यासक आहे. दि. ३–८–६८ च्या अंकातला 'भारत-पाकिस्तान आणि चीन' हा प्रदीर्घ लेख वाचला. वरीचशी पाने त्या लेखाने अकारण अडविलेली दिसतात. 'माणूस'चे वाचक अनंत. काही विचारवंत, काही क्रीयाशील व काही आचारवंत. परंतु लेखाचा रटाळपणा माझ्यासारख्या अनंत वाचकांपैकी अनेकांना जाणवला असेल. पान पलटविण्यापलीकडे त्या लेखाची योग्यता आहे असे वाटत नाही.

गोविंद किनखेडे, आर्वी

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. कथित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## सेना–तत्त्वाचा जयजयकार

शिवसेनेवरून आठवण झाली. आपल्या देशात अशा किती सेना असतील म्हणता? परवाच वर्तमानपत्रांत आकडा वाचला आणि मोठी निराशा झाली पाहा. अहो, फक्त तेवीस सेना बरे ! अधिकृत आकडा आहे हा केंद्र सरकारचा. महाराष्ट्रात शिवसेनेची स्थापना झाल्यापासून देशाच्या निरनिराळ्या भागांत एकूण तेवीस–चोवीस सेनांची स्थापना झालेली आहे. त्यांपैकी सर्वांत जास्त म्हणजे सात एकटया महाराष्ट्रात आहेत. त्या खालोखाल म्हैसूरमध्ये सहा सेना आहेत. मग कुठे तीन, कुठे दोन तर कुठं एकेक......

शिवसेनेच्या पराक्रमामुळे देशात निरनिराळ्या सेना स्थापन होत आहेत हे कानांवर होतेच. पण त्यांचा आकडा इतका कमी असेल अशी कल्पना नव्हती. फक्त तेवीस ? आपला देश केवढा, त्याची लांबीरुंदी केवढी, लोकसंख्या केवढी प्रचंड ! तेवीस सेनांनी आपले काय बरे होणार आहे ? एकेका प्रश्नासाठी एकेक सेना या हिशेबाने तेवीस प्रश्न सुटले समजा. पण अजून शेकडो राहतील त्यांचे काय ? अशा शेदीडश सेनांची स्थापना व्हायला पाहिजे. तरच देशाची धडगत आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्रात सर्वांत जास्त म्हणजे सात आहेत हे वाचून मला जरा अभिमान वाटला. विदर्भसेना, कोकणसेना, हिंदुस्थानी लालसेना, हिंदूसेना, भीमसेना व फिल्म-सेना ही त्यांची नावे वाचून समाधान वाटले. तरीसुद्धा ह्यात कितीतरी भर घालण्या-सारखी आहे. विदर्भाची गुलामगिरी नष्ट करून त्यास पश्चिम महाराष्ट्राच्या जुलमी राजवटीतून सोडवण्यासाठी विदर्भसेनेसारखी सेना हवीच. कोकणचा विकास घडवून आणून त्याचे नंदनवन करण्यासाठी ' कोकणसेना ' काढणे आवश्यकच आहे. या धर्तीवर आणखीही सेना महाराष्ट्रात का निघू नयेत ? मुंबईत शिवसेना आहेच पण शिवसेनेपासून इतरांचे रक्षण करण्यासाठी एखादी ' विष्णुसेना ' निघायला काय हरकत आहे ? पुण्यात तर गल्लोगल्ली आंतरराष्ट्रीय कीर्तीची माणसे आणि संस्था आहेत. (त्यामुळे प्रश्नही असंख्य आहेत) सदाशिव पेठ संस्कृतीवर सध्या सतत आक्रमणे चालू आहेत. ही थोर संस्कृती टिकवण्यासाठी एखादी ' सदाशिव सेना ' काढली तर काय हरकत आहे ? पुन्हा शिवसेनेची जिरवण्याची चांगली संधी.

तुमची लेको नुसती शिवसेना तर आमची सदाशिवसेना. आपले पुण्याचे वैशिष्टच कायम राहिले पाहिजे! (मागे मुंबईच्या एका साहित्यिकाने पुण्यातल्या एका थोर लेखकाला 'कावळा' म्हटले होते. त्याबरोबर पुण्याच्या थोर लेखकाने 'डोमकावळा' अशी पदवी मुंबईकर साहित्यिकाला देऊन त्याचे उसने फेडले! शाब्दिक वादावादीत पुण्याचा मनुष्य कधीच मुंबईकरांना हार जाणे शक्य नाही!) पश्चिम महाराष्ट्र किंवा दक्षिण महाराष्ट्र या भूमागावरही अन्याय घडतच आहेत ना! मग तेथे एखादी 'पश्चिमसेना' किंवा 'दक्षिणसेना' काढायला काय हरकत आहे? आणि मराठवाडा राहिलाच. तो तर मागासलेला प्रदेश. सेना काढण्याचा त्यांचा हक्क कोण डावलू शकेल? त्यांनीही यात पुढाकार घ्यावा. संतांची कर्मभूमी असल्यामुळे 'संतसेना' हे नाव तेथे अगदी शोभून दिसेल! पुढारी मंडळी काय करीत आहेत? कर्तृत्वाला एवढा वाव असताना त्यांनी गप्प का बसावे हे बरोबर आहे काय?

ही प्रादेशिक दृष्टी सोडा. आपापल्या व्यवसायानुसारही असली सैन्ये काढायला कितीतरी स्कोप आहे. कारागीर मंडळीत सेना न्हावी हा फार मोठा संत होऊन गेला. ('आम्ही बारीक बारीक! करू हजामत बारिक बारिक' हा अभंग प्रसिद्धच आहे.) या संताच्या नावाने 'सेना-सेना' ही संघटना काढून आपले प्रश्न सोडवून घ्यायला हरकत ती कोणती? इतर सेनात आणि या सेनेत फरक राहील तो हा की, या सेनेतील सैनिकांजवळ आधीचीच शस्त्रे असतील! आणि मोठमोठ्यांची डोकी फार चट्दिशी त्यांच्या ताब्यात घेतील! कोणताही प्रश्न सोडवणे हे मग अगदी सुलभ! टिपूसेना, भीमसेना निघतात तर मग सेना-सेनेस कोणता मज्जाव आहे?...

सारांश काय, अशा कितीतरी सेना काढण्यासारख्या आहेत. नवऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी 'पतिसेना', (सेनापती या शब्दापेक्षा 'पतिसेना' हे नाव किती छान वाटते!) आचाऱ्यांचे जीवन सुधारण्यासाठी 'बल्लव सेना', (प्रत्येक सैनिकाच्या हातात झारा आणि पळी ही आयुधे.) लोकांची गैरसोय दूर करण्यासाठी अटणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी एखादी 'वसंतसेना', अहो, कितीतरी सेना आज देशाला हव्या आहेत. त्यातच राष्ट्राचा अभ्युदय का कायसासा आहे तेव्हा उठा आणि सैन्य स्थापन करा. या दसऱ्याच्या मुहूर्तावरच नवी सेना, नवी घोषणा आणि नवे नेतृत्व निर्माण करा. म्हणजे तुमची बहीण तुम्हाला आनंदाने ओवाळील. मग कवी म्हणतील,

"भाई सेना स्थापन करूनि
मोरू परतोनी आला.
बहीण काशी ओवाळी त्याला
दसरा सण मोठा। नाही आनंदा तोटा"

# फेररगुरुजींचें पुनरागमन

आपले फेररगुरुजी परत येणार बरे का ! फेररगुरुजी म्हणजे कोण हे लक्षात आले ना ? आपले मनमाडकर फादर फेरर, महाराष्ट्र सरकारने दुष्टपणाने ज्यांना बाहेर हाकून ल.वले ते थोर गृहस्थ. ते गेले तेव्हा आपल्याला किती वाईट वाटले होते ! दुःखाने आपण फक्त हंबरडाच फोडायचे ठेवले होते, पण घाबरू नका. सत्याचा वाली परमेश्वर आहे, नुकतीच आनंदाची बातमी आली की फेररकाका परत येण्याचा संभव आहे. गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. विद्याचरण शुक्ल यांनी नुकतेच लोकसभेत सांगितले की, फादर फेररविरुद्ध महाराष्ट्र सरकारने केलेले सर्व आरोप जरी पूर्ण खरे असले तरी गुजराथ व आंध्र राज्यांनी फादर फेररला आश्रय देण्यास मान्यता दिली तर भारत सरकार त्याचा विचार करील. फेररसाहेबांनी पुन्हा भारतात आपले 'कार्य' सुरू करण्यास परवानगी मागितली आहे. गुजराथ किंवा आंध्र प्रदेश सरकार आपल्या राज्यात त्यांना हे 'कार्य' सुरू करण्यास परवानगी देत असेल तर आम्ही आवश्यक ती कृती करू.

समजली ना ही आनंददायक वार्ता? फेररसाहेब भारतात यायला उत्सुक आहेत. केंद्र सरकारही त्यांना परवानगी द्यायला तयार आहे. आता अडचण काय ती राज्य सरकारचीच. त्यांनी हो म्हटले की झाले, फेररसाहेब आलेच म्हणून समजा आपले 'कार्य' कळायला, महाराष्ट्र सरकार कितीही आठमुठे असले तरी भारत सरकार तसे नाही, इतर राज्येही नसतील, तेव्हा हे जमणार, गड्यांनो, आनंदीआनंद करा, मजा करा.

भारत सरकारचे हे अधिकृत निवेदन वाचून लोकशाहीप्रेमी आणि निधर्मी वृत्तीच्या सर्व नागरिकांना हर्ष होईल यात काही शंकाच नाही, माझ्या डोळ्यांपुढे तर अशा प्रकारच्या बातम्यांची गर्दीत गर्दी झाली, या पाहा त्या बातम्या—

## प्रख्यात डाकूस न्याय मिळाला

...महाराष्ट्रातील प्रख्यात डाकू व दरोडेखोर संभ्या तंट्या मानकापे यास सरकारने माणसे ठार मारण्याच्या व दरोडे घालण्याच्या आरोपावरून हद्दपार केले होते, त्याची आपले कार्य पुढे चालू ठेवण्याची इच्छा होती व तसे त्याने भारत सरकारला कळविलेही होते. यासंबंधी खुलासा करताना भारत सरकारचा एक प्रवक्ता म्हणाला,

"राज्य सरकारचे आरोप खरे असले तरी आम्ही डाकू संभ्या तंट्या यास आपले कार्य पुढे चालू ठेवण्यास परवानगी देणाच्या विचारात आहोत. या प्रकरणी आम्ही बंगाल व आसाम सरकारला विचारणा केली आहे. त्या राज्यात दरोडे व प्राणहानी बरीच कमी आहे, हे कार्य आपल्या राज्यात चालू करण्यास संभ्या तंट्या

यास ते परवानगी देत असतील तर आम्ही आवश्यक ती कारवाई करण्यास तयार आहोत,... "

## प्रसिद्ध दारूबाजास परत परवानगी

...या भागातील सुप्रसिद्ध दारुडे गुत्तामल बाटलीवाला यांना दारू पिऊन गटारात लोळण्याबद्दल व शिवीगाळ करण्याबद्दल सरकारने अटक केली होती. श्री. बाटलीवाला हे गुप्तपणे एक दारूभट्टी व दारूचा गुत्ताही चालवीत होते. सरकारजवळ तसा भरपूर पुरावा होता. म्हणून सरकारने बाटलीवाला यास आपल्या हद्दीबाहेर तडीपार केले. तथापि श्री. बाटलीवाला यांची इच्छा मात्र हे काम पुढेही चालू ठेवण्याची होती. त्यांनी केलेली शिवीगाळ फारच प्रतिभाशाली जातीची असून आपल्या लोकांना ते उत्कृष्ट शिक्षण मिळणे आवश्यकच होते. तसेच जोपर्यंत गटारे अस्तित्वात आहेत तोपर्यंत गटारात लोळण्याचा जन्मसिद्ध अधिकार प्रत्येकाला आहेच व तो कुणालाही नाकारता येणार नाही अशी भूमिका काहींनी घेतली. श्री. बाटलीवाला यांना वाटल्यास दुसऱ्या ठिकाणी हे कार्य चालू ठेवण्यास परवानगी मिळावी अशी खटपट करण्यात आली. या प्रयत्नास यश येत आहे असे दिसते.

या प्रकरणी खुलासा करताना केंद्र सरकारचे एक मंत्री म्हणाले,

"श्री. बाटलीवाला यांच्याविरुद्ध करण्यात आलेले सर्व आरोप खरे आहेत. तथापि आपले जीवितकार्य करण्याची त्यांची तळमळ ध्यानात घेऊन त्यांना अन्यत्र काम करण्यास परवानगी देण्याचा विचार आम्ही करीत आहोत, मध्यप्रदेश आणि केरळ या राज्यांत या विषयास खूपच वाव आहे. आम्ही या दोन्ही राज्यांकडे पृच्छा केली आहे. जर वरील दोन्ही राज्यांनी गुत्तामल बाटलीवाला यांचे हे कार्य आपल्या राज्यात चालू करण्यास काहीच हरकत नाही असे कळवले तर मग आवश्यक ती कृती केली जाईल."

## रिटर्न ऑफ फ्रँकेस्टाईन

...या राज्यात 'फ्रँकेस्टाईन' नावाचा अती भयानक चित्रपट दाखविण्यात येत होता. हा चित्रपट पाहताना मुले भयंकर किंकाळ्या मारीत आणि बायका बेशुद्ध पडत. काही मुले चित्रपट पाहून झाल्यावर अनेक दिवस रोज रात्री आरडाओरडा करीत जागी होत. यामुळे सरकारने हा चित्रपट दाखवण्यास बंदी केली होती. त्यामुळे हा चित्रपट परत परदेशात पाठवण्यात आला. तथापि खुद्द फ्रँकेस्टाईनची येथे येऊन लोकांना भीती दाखवण्याचे कार्य पूर्ववत् चालू ठेवण्याची इच्छा होती. म्हणून राज्य सरकारने या चित्रपटावर घातलेली बंदी अगदी समर्थनीय व योग्य होती हे मान्य करून सुद्धा भारत सरकार हा चित्रपट इतर राज्यांत दाखविण्यास परवानगी देण्याचा विचार करीत आहे.

या वार्तेचे स्पष्टीकरण करताना केंद्र सरकारचे एक श्रेष्ठी म्हणाले,

" ... राज्य सरकारचे म्हणणे अगदी बरोबर आहे. तथापि फ्रँकेस्टाईन यांची

(पृष्ठ १५ वर चालू)

रातराणी

विजय तेंडुलकर


# अ मॅटर ऑफ इनोसन्स

लहानपणी आमच्या शाळेच्या क्रिकेट टीम मधला खेळाडू 'रणजी' सामन्यात प्रथम खेळणार असला म्हणजे आम्हाला त्याची जी अपूर्वाई असे ती विचारू नका. आमचा खेळाडू अगदी अकरावा खेळण्याला गेला तरी आम्हाला तो 'हीरो'च असे आणि भोपळा न फोडता तो नाबाद परत आला तरी दातओठ खाऊन आम्ही त्याला जणू एखाद्याने सेंच्युरी मारावी तशा दणाणा टाळ्या देत असू. परवाच्या "मॅटर ऑफ इनोसन्स" या साहेबाच्या इंग्रजी चित्रपटात तर आमचा शशी कपूर चक्क 'हिरो'च होता. हेली मिल्स या साहेबाच्या नटीचे त्याने कॅमेऱ्याला साक्ष ठेवून दरदरून चुंबन घेतले. खोटे कशाला सांगू, इतक्या वर्षांनी आपण तेव्हा पुन्हा दातओठ खाऊन टाळ्या हाणल्या !

तसे साहेबाच्या नटीचे चुंबन काही वेगळे लागत नसेल हे कळण्याइतकी अक्कल आता आली आहे. तरी पण राहवलेच नाही ! ज्याला काही महिन्यांमागे वरळीच्या रॅम्नॉर्ड लॅबोरेटरीच्या फूटपाथवर चारपाच जणांबरोबर पान खात गप्पा करताना साक्षात् पाहिले तो शशी ( ही पुण्याची सवय. एस. एम. जोशी ? छे, आपले एसेम; जयंत नारळीकर ? हट् आमचा जयंता. सगळे जणू आमचे लंगोटीयार दोस्त ! ) हेली मिल्सच्या ओठांना मुंग्या आणीत होता ही काय साधीसुधी गोष्ट होती ?

खरे म्हणजे केवळ एवढ्यासाठीच हा 'मटर ऑफ इनोसन्स' पाहण्याची इच्छा होती. आणि एवढे सोडले तर या चित्रपटात फारसे काही सापडलेही नाही. 'पॅच ऑफ ब्लू' हा अविस्मरणीय चित्रपट दिग्दर्शित करणारे गायग्रीन यांनी त्या सुरेख चित्रपटात वापरून जो काही नावापुरता 'ब्लू' म्हणजे भावनांचा आल्हाद-दायक निळा रंग उरला तो पाण्यात बुचकळून या चित्रपटात वापरला असे आपले मत बनले.

ब्रिटिश नाटककार नोएल कॉवर्ड यांची ही मुळातली गोष्ट. हे कॉवर्डसाहेब ब्रिटिश रंगभूमीवरचे मो. ग. रांगणेकर म्हणता येतील. हलकेफुलके नाट्य आणि चुरचुरीत संवाद म्हणजे त्यांची नाटके. त्यांची ही तशीच गोष्ट; हलकीफुलकी, आणि माफक गंमतीदार व्यक्तिरेखा, गंमतीदार प्रसंग, चटपटीत संवाद आणि सिंगापूरची जरा नावीन्यपूर्ण पार्श्वभूमी इतक्या मसाल्याने युक्त. याला जोड म्हणून एक हळवे, कोवळे प्रेम.



दैव दिग्दर्शकाला फितूर

म्हणजे बेकरी चालवणाऱ्या मिसेस बार्लो नावाच्या बाईंना होती एक तरुण मुलगी. हिचे नाव होते पोली. नाकावरचा चष्मा सावरीत फिरणारी ही अनाकर्षक पोली खपणार कशी ही काळजी बेकरीच्या व्यापातही मिसेस बार्लोंना असावी. तेवढ्यात त्यांची पैशाने गब्बर आणि भयंकर खादाड बहीण मिसेस इन्नेस हूक निघाली होती सिंगापूरकडे प्रवासाला. तिला प्रवासात कुणीतरी सोबत हवीच होती. उगीच कुणी पगारी घेण्यापेक्षा भाचीला न्यावे असे तिच्या काटकसरी मनात आले. पोली एका पायावर तयार झाली. त्याच त्या रोजच्या रुक्ष जीवनाचा तिलाही उबग आलाच होता. जरा काही बदल घडेल असे तिच्या मनाने घेतले. अर्थात् तिची खादड, कंजूष आणि किरकिरी मावशी ही काही मोठीशी सुसह्य बाब नव्हती, पण तरीही पोलीने ठरवले, निघायचे. तिच्या कल्पनेत असेही एक स्वप्न तरळून गेले की कुणी सांगावे ? कदाचित त्या अगदी नवख्या आणि अद्‌भुत जगात आपल्याला एखादा राजपुत्र भेटेलदेखील ! पोलीच्या आईने अनुमती दिली.

गलेलठ्ठ, खादाड मावशी आणि स्वप्नाळू, चष्मेवाली भाची अशा दोघी बोटीत बसल्या. बोट सिंगापूरच्या धक्क्याला लागली. धक्क्यावर या दोघींना उतरवून

घेण्याला पोलीचा बॉब-मामा 'येणार' होता. हा सिंगापूरच्या रबराच्या मळ्यात मक्ता ठेवून होता. तो एक चिनी बाईही 'ठेवून' होता. शिवाय अवतीभवती दारूच्या बाटल्याही ठेवण्याचा त्याचा प्रघात होता. असा हा सर्वगुणसंपन्न मामा आयत्या वेळी धक्क्यावर आलाच नाही. त्याने त्याची बाई घेतली आणि सिंगापुरात चैन करण्याला तो गेला. बहिणीविषयी नाहीतरी त्याला प्रेम नव्हतेच. पण तरीही हा अफाट माणूस तसा कर्तव्याला चुकला नाही. त्याने आपल्यातर्फे एका युरेशियन म्हणजे अर्ध साहेबी, अर्ध आशियाई रक्ताच्या माणसाला धक्क्यावर पाठवले. त्याचे नाव "अमाझ–". हा तरुण देखणा आणि हसतमुख होता. असा इसम चित्रपटाचा नाहीतर कादंबरीचा हीरो होण्यासाठीच जन्मलेला असतो. हा 'अमाझ' मिसेस इन्नेस हूकच्या आणि पर्यायाने चष्मेवाल्या पोलीच्या दिमतीस राहिला; आणि पोलीचा तो हीरो होणार हे ठरले. पोलीचा बॉब–मामा भयंकर आजारी आणि बिछान्यात असल्यानेच धक्क्यावर आला नाही असे त्याने, मामाने पटवल्याबरहुकूम, सांगितले. लगेच वाटेत, रिक्षात बसून आपल्या 'बाई'च्या गळ्यात हात टाकलेला मामा पोली आणि तिच्या मावशीच्या दृष्टीस पडू नये या सद्हेतूने या उमद्या अमाझने चक्क वाहातूक-नियम मोडला आणि फळवाल्याचे एक सबंध दुकान उलथून गाडी पुढे हाणली, इतका हा हाडाचाच उमदा.

पोली त्याच्यावर निहायत खूष झाली तर नवल ते कसले ? असल्या आल्हाददायक चित्रपटात दैव नेहमी दिग्दर्शकाला फितूर असते. पोलीची धनाढ्य विधवा मावशी खूप खाऊन पोहण्यासाठी तलावात उतरली ती वर आलीच नाही. आता पोलीला मावशीची इस्टेट मिळाली आणि वर मावशीचा ससेमिरा कायमचा संपला. त्यात सिंगापूरसारखे अद्‌भुत रम्य गाव. आणि दिमतीला जन्मजात 'हीरो' अमाझ. मावशीच्या मरणाचे तिळमात्र दुःख न करता पोली अमाझच्या प्रेमात उभीआडवी पडली आणि प्रेमाच्या परिसाच्या स्पर्शाने तिच्यात क्रांती झाली. ती पूर्वीची अनाकर्षक पोली राहिली नाही. ती नाकावरून ओघळणाऱ्या चष्म्याऐवजी 'कॉंटॅक्ट लेन्सेस' लावणारी, सौंदर्यप्रसाधनांच्या जादूने कायापालट घडलेली आकर्षक पोली बनली. अमाझ राजकुमार, पोली राजकुमारी.



# कला : बाहेरची हालहवाल

आपल्याकडे आपलो नव्या दमाचा प्रयोगशील कुमार गंधर्व कैलासवासी बाल गंधर्वांचे संगीत गाण्यात प्रयोगशीलता मानीत असता बाहेरल्या जगात कलेची धाव कोठवर गेली आहे याची चुणूक कधीतरी तिकडली नियतकालिके चाळताना मिळते आणि किंचित्काळ डोके गरगरते.

अमेरिकेतील 'न्यूजवीक' साप्ताहिकाच्या ताज्या अंकात सांगण्यात आले आहे की, 'नवी कला–जुनी कला, स्थापत्य, शिल्प, चित्रकला असले भेदाभेद इतिहास–पूर्व कालाइतके आता पुराणे झाले आहेत, असे काही कोणी तिकडे मानीत नाही. 'विशुद्ध कल्पना' एवढा एकच परवल आज कला–जगतात अस्तित्वात आहे. आजच्या नव्या कलावंतांना कारागिरीची नफरत आहे, तपश्चर्या वगैरे करण्याची मुळीच इच्छा नाही. कलेचेही 'करीअर' मानून चिकाटीने तिच्यात स्वत:चा उत्कर्ष वगैरे साधण्याच्या कल्पनेला आता नवे कलावंत एल.एस.डी नाहीतर मारिज्युआनासारख्या मादक द्रव्याच्या तारेत केवळ मंदसे हसतात, बस्स ! कला म्हणजे त्यांच्या लेखी, जे आजवर कोणी केले नाही ते करणे. याप्रकरणी संवेदनाक्षमता, आत्माविष्करण, हेतुपूर्वकता असले आपल्याकडे आवर्जून वापरले जाणारे शब्द हद्दपार झाले आहेत. मग मानवतावादी वगैरे शब्दांची तर बातच सोडा ! कलाकृती म्हणजे 'निश्चित अशी वस्तू.' ही दिसते तेवढीच असणार. उगीच तिच्यातून श्लेष काढण्याचे काम नाही. कलावंताच्या मनात असेल आणि तो म्हणेल ते तिचे स्वरूप. खलास.

आजचा तेथला कलावंत मुद्दामच टाकाऊ, कुणी उपयोगात न आणलेल्या, संग्रह होण मुष्कील अशा गोष्टी शोधून त्यातून आपली कल्पना घडवतो. काही चित्रकार एवढी मोठी चित्रे रंगवतात की ती कितीही मोठ्या दालनात लागणे अशक्य ! काही आपल्या कला–कल्पना चक्क पुरूनच ठेवतात. त्या भविष्यकाळात लोकांच्या हाती पडल्या तर पडतील. काही अशी शिल्पे तयार करतात की ती जरा हलवली की निक्काल ! कोणी वाळवंटात जाऊन 'प्रसूत' होतात तर कोणी खुद्द प्रकाशाचाच

कलाकृतीसाठी कच्चामाल म्हणून उपयोग करतात. आणि कोणी कोणी तर काही करण्याचेच नाकारतात. कल्पना विशुद्ध राहिली पाहिजे या आग्रहाने ते तिला आकारच देण्याचे नाकारतात.

मॅक्स कॉझलॉक हे एक टीकाकार आहेत. हे म्हणतात की आजच्या नव्या कलावंताला उंची आणि खोलीत रस नाही. अधिकाधिक व्यापक असा त्याचा शोध चालू आहे. कलाकृतीपेक्षा तिच्यामागील या शोधानेच कलावंताचा वकूब आज ठरतो. डेनिस ओपेनहेम हा कलावंत कॅनव्हास आणि स्टुडियो सोडून आता एका पठारावर पोचला आहे. लाकडाच्या ढलप्या त्या उतारावर लहानमोठ्या वर्तुळाकारात रचून त्यातून तो एक प्रचंड कलाकृती जन्माला घालतो आहे. त्यानंतर भुई खोदण्याची आणि खडक फोडण्याची मोठमोठी यंत्रे घेऊन तो कॅलिफोर्नियात एका उघड्या जागी कडेकपाऱ्या खोदून तोडून एक कलाकृती निर्माण करणार आहे. निसर्गाला कलाकृतीच्या चौकटीत बंदिस्त करण्याऐवजी हा कलावंत थेट निसर्गाच्या उदरात शिरून कलाकृती खोदणार आहे. माइक हेझर म्हणून शिल्पकार नेवाडाच्या वाळवंटात एक अडीच मैल लांबीरुंदीची कलाकृती निर्माण करीत आहे. ही विमानातून पाहावी लागेल ! नील जेनी म्हणतो की भोवतालच्या जगाचा कोणताही भाग घ्या आणि संदर्भ तोडून तो प्रदर्शनात मांडा. तो सुंदरच वाटेल. सौंदर्य निर्माण करणे मुळी कठीण नाहीच, ते न निर्माण करण्यात खरी कसोटी आहे. म्हणून तो पाण्याच्या तरफा, शेवाळ, असले काही घेऊन त्याची मुद्दाम अ–सुंदर मांडणी करतो. ॲलेन सॅरेट हाती लागेल तो कोणताही पृष्ठभाग चुरगळून त्याच्या सुरकुतल्या पार्श्वभूमीवर आपली कला झाडूने रंग उडवून नाहीतर रंगात भिजवलेल्या रिबिनी फरफटवून निर्माण करतो. आणखी एका रिचर्ड सेरा नामक चित्रकाराने कुंचले म्हणून ससे, डुकरे, कोंबड्या पाळल्या आहेत. ब्रूस नाउमन म्हणून आहे त्याने भुईवर खूप पीठ उधळून ते इकडे तिकडे ढकलून त्याचे बरेच फोटो घेतले; निरभ्र निळ्या नितळ आभाळाचे बरेच फोटो घेतले; आणि यातून दोन पुस्तके तयार केली आहेत. 'निरभ्र आभाळ' असे यातल्या दुसऱ्या पुस्तकाचे नाव आहे. स्वतः व्हायोलिन वाजवण्याला तो अगदी प्रथम शिकू लागला तेव्हा त्याचा त्याने चित्रपट घेतला. कलाकृतीत काहीतरी अ–पूर्व आणि खरोखरी नवे असले पाहिजे असे त्यालाही वाटते. जेम्स टरेलने एक फिल्म प्रोजेक्टर अधांतरी लटकवून त्यातून हिंदकळणाऱ्या छायाप्रकाशाचेच एक शिल्प 'प्रदर्शन' म्हणून मांडले. तो म्हणतो, प्रदर्शनात दिवे गेले की चित्रेही जातात; यातून मला प्रत्यक्ष प्रकाशातून कलाकृती निर्माण करण्याचे सुचले. जोसेफ कोसुथ म्हणून आहे तो भोवती भरपूर ग्रंथ ठेवतो. यात तेरा शब्दकोशदेखील आहेत. कल्पना हवी असली की यातल्या एखाद्या ग्रंथातून तो ती हेरतो, ब्लेडने तेवढाच शब्द कापून घेतो, वहीत चिकटवतो. कलाकृतीची 'ऑर्डर' आली की वहीतला कोणता तरी एक शब्द फाडून त्याची मोठी फोटोस्टॅट प्रत काढून घेतो.

यात अक्षरे पांढरी आणि पार्श्वभूमी काळी असते. हीच त्याची कलाकृती. पण ही पाहूनही कोसुथ असमाधानी होतो. त्याचे म्हणणे; 'माझ्या मनासारखी काही ही उतरली नाहीच.'

हे वाचल्यावर आपल्याला क्षणभर वेड्यांच्या एखाद्या इस्पितळाबद्दल वाचत असावे तसे वाटते, पण तिकडले टीकाकार म्हणतात की ही नव्या दमाची कलावंत मडळी साधी बंडखोरदेखील नाहीत. गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या नव्या कलाप्रवाहांच्या परंपरेतूनच ही वर आली आहेत आणि त्या परंपरेत त्यांची मुळे भक्कम रुजलेली आहेत, असे हे जाणकार लोक छातीवर हात मारून सांगतात. प्रथम आली केवळ वास्तवाच्या जागी अंतःप्रेरणा. ती देईल तो कलाकृतीचा आकार. नंतर आला कागदावर केवळ रेषा आणि रंगच काय म्हणून? असे विचारणारा पंथ. मग कागदावर सिगरेटची थोटके आणि वर्तमानपत्रांचे चिटोरेदेखील इतर अनेक गोष्टींबरोबर चिकटवून त्यातून 'पॉप' आणि 'ऑप' आर्ट दाखवली जाऊ लागली. एकीकडे रंगांचे अक्षरशः डाग पाडून त्यातून कलाकृती तयार होऊ लागल्या तर त्याच वेळी इमारत रंगवाली तशा शिस्तीने कागद रंगवून त्यातूनदेखील कलेची अभिव्यक्ती होऊ लागली. अगदी सोपे आकार (Forms) कलाकृतीसाठी अत्यावश्यक मानले जाऊ लागले. यातून, न दिसणारे अन्य काही शोधणे वर्ज्य ठरवण्यात आले. सध्याची कलेतली 'विशुद्ध कल्पना' चळवळ याचाच साहजिक परिपाक मानण्यात येते. 'नित्य नवे' हे या कलेचे अक्षरशः ब्रीद आहे. म्हणजे अ या कलावंताने काल ब ही कलाकृती निर्माण केली म्हणून आज पुन्हा ब साच्याचीच कलाकृती निर्माण करण्याचे बंधन त्याच्यावर मुळीच नाही, अशा ही आजची नवी मंडळी मानतात. किंबहुना तसे चुकूनसुद्धा घडता कामा नये अशी त्यांची धडपड असते. यातला पीटर यंग नामक चित्रकार म्हणतो की, साच्यात बसले की मरण ओढवलेच समजा. वर्ष-दीड वर्ष म्हणजे शिकस्त. मी मुळी इतक्या वैचित्र्याने काम करतो आहे की माझे एकही चित्र 'हे माझे' म्हणून ओळखू येता कामा नये! बिल बॉलिंजर म्हणून एक शिल्पकार आहे. तो म्हणतो, आयुष्यभर साले तेच तेच करायचे? अरे हट्! डेव्हिड पॉल या कलावंताने लाकडीखोक्यांच्या वेगवेगळ्या लोकविलक्षण आकारांतून आपली कला दाखवणे थांबवले आणि आता तो रबर मॅटिंगमध्ये चित्रविचित्र प्रकार विणतो. फ्रेड सॅन्डबॅक म्हणून शिल्पकार आहे तो म्हणतो आधी दगडधातूतून आकार काढीत होतो. एकदम कल्पना सुचली, धागा! आता लवचीक वेताच्या धाग्यांचा उपयोग करून अवकाशाचीच शिल्पे बनवतो! धाग्यांनी आणि वायरींनी आउटलायनी दाखवल्या की मध्ये अवकाश कसे धातूसारखे दाट, घट्ट बसते!

आपण यांना वेडे म्हटले तरी हे एम. ए. वगैरे होतात. शास्त्र, तत्त्वज्ञान, साहित्य, चित्रपट यांचे जाणकार यात आहेत. यांच्या आधीचे कलावंत एलएसडीसारख्या मादक द्रव्याचे सेवन स्फूर्तीसाठी करीत. त्या आधीचे एकेक, चिक्कार दारू

पीत आणि लौकर मरत. त्याचा त्यांच्या स्फूर्तीशी संबंध नसे. ही नवी तरुण कलावंत मंडळी या मद्यप्याप्रमाणे, एक सवय म्हणून एलएसडीचे सेवन करतात पण त्यांची स्फूर्ती त्यावर मुळीच अवलंबून नसते. स्वतःला 'असा–मी' मानून चित्रविचित्र बनून मिरवण्याची हौस यांना नाही. यांच्या आधीपर्यंतच्या कलावंतांनी कधी 'युगप्रवर्तक' म्हणून तर कधी 'बंडखोर' म्हणवून घेऊन हे भरपूर केले. हे आजचे नवे कलावंत त्यांच्यासारख्या शंभर इतर माणसांत वेगळे ओळखूही येणार नाहीत. कलावंत कलंदर म्हणून नजरेत भरेल तो कदाचित अकौंटंट असू शकेल !

देवदयेने यांचे चालले आहे उत्तम असे दिसते. वेगवेगळी संग्रहालये नवनव्या अ-पूर्व कलाकृतींसाठी टपलेली आहेत. पूर्वी कलावंताचे 'नाव' प्रथम व्हावे लागे, मग त्याच्या कलाकृतींना मागणी येई. आता नव्या अनामिक धडपडत्या कलावंत चंडोलांशी बोलून सवरून संग्रहालयांचे दर्दी 'स्काउट' त्यातले कोण नाव काढणार हे ठरवतात आणि नाव होण्याआधीच कलाकृतींना मागण्या घालतात. फौंडेशन्सच्या स्वरूपाच्या संस्थाही कलावंतांना अर्थसाहाय्य देतात.

या प्रकारांनी पिसाळणारेही टीकाकार आहेतच. यातला एक म्हणतो की हे सगळे 'भयंकर' आहे. दुसऱ्या एमी गोल्डिन नामक म्हणतात की चालले आहे ते सगळेच निरोगी नाही. लोकांनी आणि टीकाकारांनी एखाद्या चौकटीत कोंबू नये म्हणून चाललेली ही धडपड अती स्वैर होते आहे. असल्या उनाड प्रयोगांनी कलेतील गंभीर समस्या सुटणे शक्य नाही. दुसरे एक टीकाकार हॅरॉल्ड रोजेनबर्ग म्हणतात की क्षणभंगुरतेच्या भावनेने ग्रासलेल्या आजच्या नव्या समाजाचेच हे एक द्योतक आहे. उद्याचे कुणी सांगितले आहे ? काय करायचे ते आज—ही यामागली घाई वाटते. बापामागून रीतसर वंशपरंपरागत गादीवर येतो त्याला आपल्या कारकीर्दीविषयी संभ्रम नसतो; परंतु जे बंड वगैरे करून अधिकार बळकावतात त्यांना आपल्यासारखे आणखी कोणी आपल्याला उलथून गादीवर येण्याचे भय नेहमीच ग्रासून असते. तसे या बंडखोर कलावंतांचे होते आहे.

पण आजच्या या नव्या कलावंतांना विचारले तर ते सांगतात की कसल्याही बंडखोरीत त्यांना मुळीच रस नाही. त्यांना रस फक्त कलानिर्मितीत आहे.

कलाकृतीत आपली आपल्या मनातल्या प्रश्नांची उत्तरे शोधतो. ही अगदी नवी मंडळी म्हणतात की कलाकृतीनेच प्रश्न विचारले पाहिजेत !

यालाही आपली हरकत असण्याचे कारण नाही. कलाकृतीने आणि तिच्याद्वारे कलावंताने आपली विचारपूस केली तरी पुष्कळ आहे. पण आपण म्हणू की प्रश्न फार अवघड नसावेत. अगदीच नखे चावीत, जीभ वारंवार ओठांवरून फिरवीत, आवंढे गिळीत उभ्या उभ्या पुनः पुन्हा पायावर पाय घासून उत्तर शोधण्याचा विद्यार्थिदशेत येई तसा अतिप्रसंग शक्यतोवर आपल्यावर या वाढल्या वयात न यावा. सध्याच असे काही वेळा घडते, म्हणून म्हणतो. □

तुनी पुराणे : नव्या कहाण्या

द. मा. पुराणिक

# सत्यभामा रुक्मिणी आंदोलन

पारिजातकाच्या झाडाची गोष्ट तुम्हांला माहीत आहे ना ?

एकदा असे झाले की, स्वर्गातून मुनिवर्य नारद खाली उतरून पृथ्वीवर आले. फिरत फिरत ते द्वारका–नगरीत येऊन दाखल झाले. सहज कृष्णाची भेट झाली. मोठ्या माणसाच्या भेटीला जायचे तर रिक्त हाताने कसे जायचे ? नारदमुनींना सगळ्या एटीकेटस् पूर्णपणे माहीत होत्या. त्यांनी स्वर्गातूनच पारिजातकाच्या फुलांचा एक ' बोके ' बरोबर आणला होता. तो त्यांनी कृष्णाला भेट म्हणून दिला. कृष्णाने त्याचा वास घेतला. त्यालाही तो बोके फारच आवडला. रुक्मिणीला घेऊन तो बाहेर फिरायला गेला तेव्हा त्याने तो रुक्मिणीला देऊन टाकला.

हा वृत्तांत सत्यभामेला समजला आणि मग ती अशी चिडली म्हणता काही विचारू नका.

तिने फार मोठे थैमान घातले. आपला महाल आजपासून ' बंद ' म्हणून जाहीर घोषणा केली. आपल्या दासींचा घेराओ कृष्णाभोवती घातला. द्वारका नगरीत सत्यभामेच्या पाठीराख्या मंडळींनी कडकडीत हरताळ पाळला. निषेधाचे मोर्चे निघाले. आपल्या मागण्यांचे निवेदन स्वतः सत्यभामेने कृष्णाच्या हाती दिले.

कृष्ण म्हणाला,

" लाडके सत्यभामे, तू अशी रागावू नकोस. एक फूल ते काय–"

" न्याय–न्याय पाहिजे मला. फुलाचा प्रश्न नाही हा. तत्त्वाचा प्रश्न आहे ! " सत्यभामा ओरडली.

" एवढंच ना ! हात्तिच्या. रुक्मिणीला फुले दिली. तुला सबंध झाड देतो ना ! " श्रीकृष्णाने मुत्सद्देगिरीने पवित्रा टाकला. सत्यभामा खूष झाली.

" बघा हं, सबंध झाड आणलं पाहिजे तुम्ही. दिलेला शब्द पाळला पाहिजे. "

" नक्की. तू पाहा तर खरी."

श्रीकृष्णाच्या आश्वासनामुळे सत्यभामेचे समाधान झाले. मोर्चा यशस्वी झाला. 'महालबंदी' उठली. श्रीकृष्णाने खरोखरीच स्वर्गात जाऊन पारिजातकाचे झाडच उपटून आणले. [स्वर्गात श्रीकृष्णाच्या थोड्या ओळखी होत्या. म्हणून सबंध झाडाला मंजुरी मिळाली. नाहीतर ओळखीशिवाय वर विचारतो कोण ?]

हे सगळे ठीक झाले. झाड आणायला मंजुरी मिळाल्याची बातमी द्वारकेत येऊन थडकली. पण खरा पेच तेथेच उत्पन्न झाला. रुक्मिणी आणि सत्यभामा यांचे पुन्हा भांडण सुरू झाले. हे झाड लावायचे कोठे ? रुक्मिणीच्या अंगणात की सत्यभामेच्या अंगणात ? दोन्ही पार्टीचे लोक हट्टाला पेटले.

रुक्मिणीच्या दासी म्हणाल्या,

" खरं म्हणजे रुक्मिणीबाईसाहेबांचा झाडावर अधिकार. सत्यभामा धाकटी असल्यामुळे लाडकी बायको. काही नवं मिळालं की तिच्या वाट्याला ते जाते. कारण तिचा थयथयाट फार, जरा मनाविरुद्ध गेलं की मी वेगळी होईन म्हणते ! अरे वा !"

सत्यभामेचे अभिमानी म्हणाले,

" रुक्मिणी ही ज्येष्ठ. तिच्या महालात आधीच कितीतरी गोष्टी आहेत. आम्हीच मागासलेले आहोत. आता हे झाड तरी आम्हांला नको का ? एका राजवाड्यात नांदायचं आम्ही कबूल केलं, त्याचं हे फळ ?"

ही भांडणे नेहमीची होती. ती सोडवता सोडवता श्रीकृष्णही वैतागला होता. तुमचा सारखा मुक्काम रुक्मिणीच्याच महालात का, असे सारखे टुमणे सत्यभामेने लावल्यामुळे हिवाळी मुक्काम निदान सत्यभामेच्या महालात केला पाहिजे, ही अट श्रीकृष्णाने कबूल केली होती. माझ्या महालातल्या दासींना थोडी जास्त इन्क्रीमेन्टस् मिळावीत, त्यांची सिनिऑरिटी धरली जावी हीही अट मान्य झाली होती. राजवाड्यातले बरेचसे कारभारी सत्यभामेच्याच महालातले होते. पण तरी उभय पक्षांची भांडणे मिटत नव्हती.

आता हे झाड-प्रकरण ? काय करावे ? कोठे लावावे ?

रुक्मिणी म्हणाली,

" हे बघा, माझ्या अंगणातली माती चांगली आहे. आमच्याकडे पाणी भरपूर आहे. शिवाय जायलायायला वाटाही भरपूर आहेत–"

" अगं वा गं वा ! " सत्यभामा कडाडली. " म्हणे माझ्या अंगणातली माती चांगली आहे ! अन् आमची माती काय वाईट आहे ? आमचंही अंगण चांगलंच आहे. आमच्याकडंही पाणी आहे म्हटलं ! अन् जाण्यायेण्याचा तोरा एवढा मिरवू नका बाईसाहेब, ह्या सोयी काय, केल्या म्हणजे होतात बरं."

भांडणे मिटली तर नाहीत. उलट वाढलीच. श्रीकृष्णाचे डोके फिरून गेले.

शवटी त्याने या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी एक तज्ज्ञांची समिती नेमली. हे पारिजाताचे झाड लावायला कोणाचे अंगण अधिक चांगले हे या समितीने ठरवावे असे ठरले. समितीने दोन्ही अंगणांची पाहणी केली. पुन्हापुन्हा विचारविनिमय केला. पण निर्णय काही लवकर दिला नाही. फारच आरडाओरड झाला तेव्हा श्रीकृष्णाने जाहीर केले–" तज्ज्ञांची समिती जो निर्णय देईल तो मी मान्य करीन. पार्शालिटी होणार नाही ! " आणि मग तज्ज्ञांचा म्हणून एके दिवशी एक निर्णय अचानक जाहीर करण्यात आली.

" पारिजातकाचे झाड सत्यभामेच्या महालातल्या अंगणात लावावे. तज्ज्ञांनी याच अंगणाची उत्कृष्ट जागा म्हणून निवड केली आहे."

' द्वारका-समाचार 'मध्ये हे वृत्त प्रसिद्ध होताच एकच खळबळ उडाली. श्रीकृष्णाचे रुक्मिणीवरील प्रेम लक्षात घेता तिच्या अंगणाचीच निवड होईल असा अंदाज होता. तो खोटा ठरला हे पाहिल्यावर रुक्मिणीच्या महालात कडक हरताळ पडला. कृष्णाचा निषेध झाला. या अन्यायाविरुद्ध चळवळ करण्याची भाषा उच्चारली गेली.

प्रत्यक्ष तो वृक्ष सत्यभामेच्या महालात लावला गेला तेव्हा मात्र खरोखरीच चळवळ सुरू होणार अशी लक्षणे दिसू लागली.

मग चतुर कृष्ण रुक्मिणीच्या महालात जाऊन तिला हळूच म्हणाला,

" वेडे, चळवळ कसली करतेस ? झाड सत्यभामेच्या अंगणात लावले म्हणून काय झाले ? फुले तुझ्या अंगणात पडली म्हणजे झाले की नाही ? मग झाले तर. आता हास बघू खुद्कन ! "

रुक्मिणीने चळवळ मागे घेतली. तिने जेव्हा पाहिले की खरेच, झाड नुसते सत्यभामेच्या अंगणात आहे; पण त्याची फुले मात्र आपल्याच अंगणात टपटपत आहेत. तेव्हा ती खुद्कन हसली. मनाशी लाजून म्हणाली,

" तरीच माझा कृष्ण ! उगीच नाही एवढ्या मोठ्या राज्याचा मुख्य झाला. ●

---

[ पृष्ठ ५ वरून चालू : ग्यानबाचे गुऱ्हाळ ]

तीव्र तळमळही लक्षात घेण जरूर आहे. लोकांना भीती दाखवण्याची व त्यांच्या किंकाळ्या ऐकण्याची त्यांना हौस आहे. मद्रास आणि राजस्थानात या कार्यास वाव आहे. त्या दृष्टीने आम्ही या दोन राज्यांकडे विचारणा केली असून जर त्यांचो या कार्यास परवानगी असेल तर हा चित्रपट तेथे दाखवला जाण्याच्या दृष्टीने आम्ही योग्य ती पावले उचलू..."

फेररसाहेबांना दुसऱ्या राज्यात काम करण्याची अनुज्ञा मिळणार हे ऐकल्यावर माझ्या मनात आनंदाने कल्लोल उठले त्यात अशा कितीतरी गोष्टी कल्पनेने मनासमोरून सरकल्या. महाराष्ट्राला फेररगुरुजींची विद्या थोडा काळ लाभलीच. हा प्रसाद आता गुजराथ किंवा आंध्राला तरी लाभावा अशी आपण मनोभावे प्रार्थना करू या. □


# आवाहन

अगा ! ज्ञानियाच्या राजा !
विश्व सारे तुझे घर ।
मराठीचिये नगरी
तुझे आहे रे माहेर ॥ १ ॥
माउलीच्या ममतेने
यावे आपुल्या माहेरा ।
'ब्रह्मविद्येचा सुकाळ'
पुन्हा करा ज्ञानेश्वरा ! ॥ २ ॥
'चंद्रमे जे अलांछन
मार्तंड जे तापहीन'
असा तूच एक आम्हा
खरा सोयरा सज्जन ॥ ३ ॥
कर्माकर्मांचा विवेक
राहिला ना जगतात ।
'सद्धर्माचे सूर्य–तेज'
विश्व पाहू ना शकत ॥ ४ ॥
'दुरिताच्या तिमिराने'
झाकाळली सारी भुवी ।
तुझी भावार्थ–दीपिका
पुन्हा तूच पाजळावी ॥ ५ ॥
तुझा अमृतानुभव
ज्ञानसागरीची विची ।
सच्छास्त्रिक तुझी वाणी
देते प्रमेयास रुची ॥ ६ ॥
तुझ्या मराठी बोलाने
पैजे अमृत जिंकावे ।
आणि विश्वात्मके देवे
तुझ्या वाग्यज्ञे तोषावे ॥ ७ ॥
याच–साठी सारा करा
एकदाच अट्टाहास ।
व्हावा प्राकृता जनांचा
गोड शेवटीचा दिस ॥ ८ ॥



पसायदान मागावे
सर्वे ते सुखिनः सन्तु ।
सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु—' ॥ ९ ॥

*—प्रा. मा. ल. व्यवहारे*



## पृथ्वीचा आंस ढळला आहे

पृथ्वीचा आंस ढळला आहे
धर्मराजाचा रथ धरणीला टेकला आहे
कारण त्याच्याहि कानी आली आहे
अश्वत्थाम्याच्या मृत्यूची ओरड !
शस्त्राच्या धमकावणीला बळी पडून
सत्य गयावया करते आहे संगिनीच्या टोकावर
मानवाला तहान आहे मानवाच्याच रक्ताची !
पृथ्वीचा आंस ढळला आहे !
शिळारूपी अहल्या आहे तशीच पडून आहे
वाट पाहत युगपुरुषाच्या पदस्पर्शाची
ढासळले नाही अजून वाल्याच्या अंगावरचे वारूळ
भरली नाही अजून शिशुपालाच्या पातकांची शंभरी
चक्रोद्धारासाठी कर्ण व्यर्थ धडपडतो आहे
संभवामि युगे युगे म्हणून परमात्मा मात्र
खुशाल झोपला आहे.

— सुरेश उदास

## धुंद मोगरा फुलेल

शब्दाशब्दांतूनी तुझ्या
कधी सांडते साखर
आणि ओढाळ झऱ्याचे
थरथरणारे स्वर.
मंद मंद हसण्यांत
तुझ्या आगळीच गोडी
प्रवाहात वाहताना
माझी सुखावते होडी.
गंधकळ्या उधळती
तुझे कुरळ कुतल
आता बागेतही माझ्या
धुंद मोगरा फुलेल !

— विष्णु रा. गिरी

## गीत हरवले

सात पावलांच्या सीमेवर
आज सुखाचे माप उलटले
सूर कुठे विरही हृदीचे
भैरवी आळवून गेले...
अमृताचे पान ओठी
रंगता रंगता थांबले
दोन श्वासांच्या लयीचे
गीत आज असे हरवले
मीलनाच्या रात्रीतून या
प्रहर काळाचे विरले
सुगंधाची धुंदी चढता
चांदण्याचे हात ढळले...

— सौ. सुलभा हेर्लेकर

## प्राजक्ताचा खेळ

नाही अजुनि विसरले गोकुळ
कृष्णाचा तो पावा मधुर मंजुळ ।। ध्रु० ।।

यमुनेकाठी फेर धरुनि
प्रमदा तेथील खेळती खेळ १

गोप अजुनि एक होऊनि
खेळति सूरपारंब्यांचा खेळ २

यमुना येते कधी भरुनि
गर्भातील स्मरुनी कृष्णखेळ ३

गोपगोपिका दोघे मिळूनी
कधी खेळती फुगडीचा खेळ ४

दरदिनी उषःकाली प्रांगणी
अजुनि चाले प्राजक्ताचा खेळ ५

*– गोविंद मोहनी*

## टपटपती थेंब धारा

टपटपती थेंब धारा
देती सुबत्तेचा इशारा
तृप्त पिउनि जीवन धारा
धरती पसरे सुगंध सारा
पंखांचा फुलवून पिसारा
सुचे आवर्तनृत्य मयुरा
झेलतो वृक्षपल्लवी तुषारा
ओघळती मौक्तिक धारा
हरित तृणांचा सर्व पसारा
धरतिचा हा सगा सोयरा
फुलवून खुलवून हलधरा
देती तृषार्ता अमृतधारा
चातक चोची एक निवारा
आगमनाच्या वर्षाधारा

*– महादेव साने*

## हितगुज

चांदण्याचे स्वप्न मुलायम
घेऊनी येतेस कां... ?
रातराणी होउनी
धुंद मजला करतेस का... ? ।। १ ।।

मुग्ध वेडी होऊनी
वाट अशी पाहतेस का... ?
भेट होता आपुली,
बावरी होतेस का... ? ।। २।।

हरवलेल्या माझ्या मनाची
मूक कविता होतेस का... ?
अबोल राहूनी, लोचनी तू
करीसी सखी, हितगुज का... ? ।। ३ ।।

## येताना

येताना घेऊनी ये
श्रद्धेचे हात तुझे
फुलवाया प्रीतीचे
घर माझे आज सखे... !

लेउनि ये चंदेरी
साडीतील रूप तुझे
जुई पुष्पांहूनी कोमल
मौनातुनी हास्य तुझे... !

घेउनी ये क्षितिजाचे
रंग नवे–रूप नवे.
फुलणाऱ्या प्रीतीचे
गाउ सखे-गीत नवे... !

*– शशि इनामदार*

## वैश्विक किरणे !!

नीरवतेच्या निश्चल पटली
लुकलुकणारे असंख्य तारे
दर्शनसौख्ये त्यांच्या मजला
अनागताचे पटले नाते !
झगमगणाऱ्या प्राजक्तांचे
मुक्त विखुरले तेजसडे
आणि फांकले त्या पुष्पांनी
जाणीवेतले स्तर माझे !
सर्वांगाचा झाला माझ्या
धरतीइतका पटल बिलोरी
बिंबे पाही अंगोपांगी
सहस्र नेत्री मी ताऱ्यांची !!
आणि गवसले नाते माझे
लुकलुकणाऱ्या ताऱ्यासंगे
एक सांधता धागा मध्ये
अर्णव दिसला ' वैश्विक किरणे ' !

*— शिवाजी सावंत*

## माणूस

आज निरोपाच्या वेळी
पाय वळती माघारे
अबोलीच्या वेलीवर
कोमेजती शब्द सारे
मिटलेल्या नेत्रांतून
साकारती कथा व्यथा
उमलती ओठ परी
भाव राहतो अधूरा
अधूऱ्याच भावांतून
अर्थ सारा उलगडे
' तुझें ', ' माझें ' हेही आता
व्यर्थ शब्दांचे पसारे

*सुधा इंगळे*

## गीतासार

ऊठ अर्जुना ऊठ झडकरी, बाण धनुष्या जोड
खोटी माया आणि ममता, मोह मत्सरा सोड......१
नसती काका मामा बंधू, समोरचे कोणी
केवळ माया मोहविते ही, घेई सख्या ध्यानी......२
मी तर कर्ता, मीच करविता, तू तर निमित्तमात्र
पाप घडतसे कल्पनेत या, गाळु नको गात्र......३
मारसी न तूं, मरे न कोणी, आत्मा अविनाशी
थकली काया सोडुनि घेई नव्या शरीरासी......४
सदैव आपुल्या कर्मामाजी तूं हि रत राही
कर्मफलाची नको अपेक्षा मनी धरू काही......५
ह्या विश्वाचा सूत्रधार मी, सूत्रे हालवितो
कळसूत्री त्या तुम्ही बाहुल्या, तुम्हा खेळवितो......६
संतजनांचे पालन आणि दुष्टांचे हनन
धर्म रक्षिण्या जन्म घेत मी युगे युगे जाण......७

*— रा. चिं. नातू*



# भारत, पाकिस्तान आणि चीन

चीनची अर्थव्यवस्था पाहिली तर असे दिसते की पंधरा वर्षांपूर्वी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या रचनेशी तिचे बरेच साम्य होते. त्या मानाने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेच्या रचनेशी तिचे साम्य फारसे नव्हते. त्यामुळे आर्थिक वाढीच्या क्षेत्रात चीन व भारत यांची तुलना भारत व पाकिस्तान यांच्या तुलनेपेक्षा अधिक अर्थपूर्ण ठरेल. राजकीयदृष्टचा या दोन देशांमध्ये बरीच विरोधस्थळे दिसून येतात. परंतु याकरिताच आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीची तुलना करण्याची आवश्यकता अधिक आहे, कारण आर्थिक कामगिरीवरच पुष्कळ वेळा राजकीय सिद्धांतप्रणाली आणि राज्यव्यवस्था यांचे यश अवलंबून असते.

चीनच्या आर्थिक वाढीचे मोजमाप करण्याच्या कामातली पहिली अडचण म्हणजे माहितीचा अभाव. गेल्या २० वर्षांच्या कालावधीतील अर्थव्यवस्थेशी संबंधित अनेक महत्त्वाच्या क्षेत्रातली काहीही माहिती उपलब्ध होऊ शकत नाही. परदेशातून पाहणी करायला गेलेल्या लोकांच्या मनात चीनने स्वीकारलेल्या सिद्धांतप्रणाली-विषयी तीव्र प्रतिक्रिया ( अनुकूल किंवा प्रतिकूल ) निर्माण होते. त्यामुळे त्यांच्या पाहणीतून उपलब्ध होणारी माहिती पक्षपाती असण्याचा संभव निर्माण होतो. अशा माहितीवर कितपत अवलंबून राहावे हे सांगणे कठीण.

'पाकिस्तानात औद्योगिक व शेती क्षेत्रातील वाढीला जोराची गती मिळाली असली तरी स्वावलंबी, स्वयंचलित आर्थिक वाढीकरिता जी मूलभूत परिस्थिती अस्तित्वात असावी लागते ती अजूनही पाकिस्तानात निर्माण व्हायची आहे.' –तीन ऑगस्ट अंकात प्रसिद्ध झालेल्या या लेखाच्या पूर्वार्धाचा हा निष्कर्ष.

गेल्या अंकात जागेअभावी प्रसिद्ध न होऊ शकलेला हा उत्तरार्ध.

---

लेखक : प्रा. के. अेन्. राज : दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स

---

चीनच्या आर्थिक क्षेत्राच्या फक्त एका विभागाची गेल्या काही वर्षांत बरीचशी विश्वासार्ह माहिती आपल्याला मिळू शकते. तो विभाग म्हणजे त्याचा परदेशी चालणारा व्यापार. चिनी सरकार याविषयी अधिकृत माहिती तपशीलात प्रकाशित करीत नाही. परंतु चीनशी व्यापार करणाऱ्या देशांत उपलब्ध असलेली माहिती एकत्रित करून हे चित्र आपल्याला जुळविता येईल. स्वतःच्या प्रदेशात तयार न होणारा माल व साधन मिळविण्याचे एकमेव साधन परदेशाशी व्यापार करून ती मिळविणे हे होय. त्यामुळे परदेशांशी चालणाऱ्या व्यापाराच्या आकडेवारीवरून आपल्याला त्या देशातील अंतर्गत तणावांची व प्रवाहांची कल्पना येते. ही गोष्ट विशेषतः चीनविषयी अधिक खरी आहे. परकीय हुंडणावळ मिळविण्यासाठी चीनचा स्वाभाविकच आटोकाट प्रयत्न चालतो; आणि केवळ अत्यंत आवश्यक, अटळ अशा गरजांसाठीच चीन आपली परदेशी हुंडणावळ खर्च करतो. या कारणांमुळे परदेशाशी चालणाऱ्या व्यापारविषयक आकडेवारीचे पृथक्करण व सूचक अन्वयार्थ यांच्या आधारेच चीनविषयी त्यातल्यात्यात अधिक विश्वसनीय विधाने करता येतात.

१९५८ च्या पूर्वीच्या कालावधीतील घटनांसंबंधी मात्र बरीच माहिती आपल्याला मिळू शकते. ही माहिती संपूर्णपणे बिनचूक आहे असे म्हणता येणार नाही.

परंतु सर्वच मागासलेल्या, विशेषत: ज्या देशांत आकडेवारी गोळा करण्याची यंत्रणा सदोष आहे अशा सर्व देशांची परिस्थिती अशीच आहे. चीनची या कालावधीतील जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीच्या आधारे विशेषज्ञांनी काही निष्कर्ष काढले आहेत. त्यांच्या या पायाभूत निष्कर्षांच्या आधारावर आपल्याला तदनंतरच्या घडामोडींचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करता येतो. परंतु १९५८ नंतरच्या कालावधीतील आर्थिक घडामोडींचे मोजमाप व मूल्यांकन, अपरिहार्यपणे, पुष्कळ अंशी अंदाजावर आधारलेले असल्याने, अतिशय जुजबी स्वरूपात व सावधानतेनेच चीनविषयी सर्वसामान्य विधाने या कालावधीसंबंधी करता येतील. या गोष्टीवर जितका भर द्यावा तितके कमीच आहे. १९५८ च्या अगोदरच्या चीनविषयी जी माहिती मिळते त्यावरून हे स्पष्ट होते की भारताइतकेच सामान्यत: चीनमध्ये आधुनिक उद्योगधंदे प्रगत झालेले होते. या दोन्हीही देशांत १९५१–५२ च्या सुमाराला ७० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. राष्ट्रीय उत्पन्नापैकी फक्त ६ टक्के उत्पन्न खाणी आणि आधुनिक कारखानदारी उद्योगधंदे यांपासून मिळत होते. भारताप्रमाणे, चीनमध्येही पायाभूत उत्पादक वस्तू उद्योगांची मूठभर केंद्रे होती; पण कोळशाचे उत्पादन सोडल्यास त्यांचे एकूण उत्पादन भारतापेक्षा जास्त नव्हते.

दोन्ही देशांतील उपभोगाचे मानही फार असमान होते असे दिसत नाही. चिनी नागरिकाला थोडे अधिक पोटभर खायला मिळत असावे. दरडोई २५ टक्के अधिक अन्नधान्य उपलब्ध होते. १९५२ मध्ये चीनचे अन्नधान्याचे उत्पादन (सरकारी माहितीप्रमाणे) १३८ दशलक्ष टन होते, तर भारताचे फक्त ५५ दशलक्ष टन होते. चीनमधील आकडे देताना धान्याचे वजन टरफलासकट धरले आहे, तसेच कापणी-मळणी-साठवणूक यांमध्ये होणारी नासाडी व बी-बियाण्यांकरिता लागणारे धान्य वजा केलेले नाही. या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. चीनची अधिक मोठी लोकसंख्या विचारात घेता भारतापेक्षा दरडोई फक्त सुमारे २५ टक्के जास्त धान्य चीनमध्ये उपलब्ध असावे.

भारतीय जनतेशी तुलना करता, चिनी लोक खाण्यावरील निर्बंध आणि विधिनिषेध यांच्यापासून मुक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध असलेल्या सर्व मार्गांनी खाद्य मिळवून ते त्यांचा आहार चौरस आणि पोषक ठेवू शकतात. परंतु चीनमध्ये कापड, साखर, यांसारख्या उपभोगाच्या वस्तूंचा पुरवठा कमी होता.

१९५० पासून पुढे चीनमध्ये औद्योगिक वाढ बऱ्याच प्रमाणात झाली आहे. १९५७ साली (चिनी पहिल्या पंचवार्षिक योजनेचे शेवटचे वर्ष) काही मोक्याच्या औद्योगिक वस्तूंचे उत्पादन चीनमध्ये भारतापेक्षा बरेच जास्त होते. पोलादाचे उत्पादन चीनमध्ये ५$\frac{१}{४}$ दशलक्ष टन झाले तर भारतात ते १$\frac{३}{४}$ दशलक्ष टन झाले. कोळशाचे उत्पादन चीनमध्ये १३० दशलक्ष टन झाले तर भारतात ४८ दशलक्ष



**१९५०–५१ : भारत आणि चीन यामध्ये फारशी तफावत नव्हती.**

टन झाले. सिमेंटचे उत्पादन चीनचे ७ दशलक्ष टन तर भारताचे ६ दशलक्ष टनांवर थोडेसे इतके झाले. १९५७ च्या पुढील काळात या उत्पादनात आणखी बऱ्याच प्रमाणावर वाढ झाली आहे, परंतु या वाढीचे प्रमाण काय आहे, ह्याची माहिती उपलब्ध नाही.

वेगाने झालेल्या ह्या औद्योगिक विकासामुळे चीनच्या अर्थव्यवस्थेची ताकद वाढली आहे, या मुद्याकडे आपण लवकरच वळणार आहोत. **पण तत्पूर्वी हे लक्षात घ्यायला हवे की, औद्योगीकरण झपाटचाने झाले असले तरी चीनची अर्थव्यवस्था अद्यापिही शेतीप्रधानच** आहे. **शेती हेच उपजीविकेचे प्रमुख साधन** आहे **आणि राष्ट्रीय उत्पन्नापैकी बराच मोठा भाग शेतीमधूनच प्राप्त** होतो.

चीनच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या स्रोतांविषयीच्या पाश्चिमात्य अंदाजांवरून यापेक्षा वेगळेच, नेमके विरुद्ध चित्र सहजी (जे वस्तुतः फसवे आहे) डोळ्यासमोर उभे राहते. उदाहरणार्थ, एका अंदाजाप्रमाणे १९५२ साली खाणी व कारखानदारी उद्योगधंद्यांपासून प्राप्त झालेले उत्पन्न एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११ टक्के होते. (भारताचे फक्त ६½ टक्के होते.) १९५७ मध्ये त्यांचा हिस्सा २० टक्के झाला. चीनच्या राष्ट्रीय उत्पन्नात आधुनिक उद्योगधंद्यांचा हिस्सा इतका मोठा दिसण्याचे एक महत्त्वाचे कारण असे की, उत्पादनाचे मूल्य मोजताना ज्या किमती धरल्या त्या औद्योगिक वस्तूंना सापेक्षतः जास्त झुकते माप देणाऱ्या राहिल्या आहेत. युद्धपूर्व काळाशी तुलना करता, १९५०–६० या काळात भारतासारख्या देशात शेतमालाच्या किमती औद्योगिक वस्तूंच्या तुलनेत खूप अधिक प्रमाणात वाढल्या होत्या, परंतु चीनमध्ये परिस्थिती नेमकी ह्याच्या विरुद्ध दिसते. चीनमध्ये १९५२ साली शेती-

मालाच्या किमती १९३३ सालच्या किमतींच्या दुपटीपेक्षा थोडया कमी होत्या, तर कारखान्यातून तयार झालेल्या उपभोग्य वस्तूंच्या किमती जवळपास पाचपट आणि भांडवली वस्तूंच्या किमती तर ह्यापेक्षाही जास्त होत्या. त्यामुळे, साहजिकपणेच, १९५२ च्या किमतींमध्ये राष्ट्रीय उत्पन्न मोजले गेले, तेव्हा त्यात आधुनिक उद्योगधंद्यांचा वाटा बराच मोठा दिसून आला. राष्ट्रीय उत्पन्न काढण्यासाठी सापेक्ष किमतींची शेतमालास अधिक अनुकूल अशी चौकट वापरली असती तर चित्र काही वेगळेच दिसले असते.

अजूनही चीन शेती उत्पादनावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. भारतापेक्षा हे अवलंबन कमी नाही इतकेच केवळ नाही, तर चीनमध्ये शेतीचा विकास औद्योगिक क्षेत्रातील विकासाइतका मुळीच उठावदार झालेला नाही. किंबहुना असे म्हणता येईल की, भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्रांनी (जरी जास्त नाही तरी) चीनच्या बरोबरीने शेतीत प्रगती केली आहे. अर्थात चीनविषयी आपल्याला अगदी बिनचूक माहिती मिळत नाही आणि त्यामुळे या विधानाच्या अचूकतेविषयी खात्री देता येत नाही.

अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत चीनला विशेष अनुकूल असा अंदाज खरा धरला तरीही १९६४ सालचे धान्योत्पादन हे युद्धपूर्व काळातील उच्चतम धान्योत्पादनाच्या फक्त ५० टक्के अधिक आहे. युद्धामुळे आणि राजकीय अव्यवस्थेमुळे विस्कळीतपणा आला होता त्यानंतर, सरकारी अधिकृत माहितीप्रमाणे, १९५२ साली परत युद्धपूर्व काळातील उच्चांकाइतके धान्योत्पादन झाले. पुढील पाच वर्षांत उत्पादनात आणखी $\frac{1}{3}$ ने वाढ झाल्याचे जाहीर करण्यात आले. परंतु याच्यापुढील काळात प्रगती फार मंदावली. १९६४ सालचे उत्पादन १९५७ सालच्या उत्पादनापेक्षा फक्त १० टक्क्यांनी वाढले असा अंदाज केला गेला आहे. १९६० साली अवर्षणामुळे अत्यंत कमी धान्योत्पादन झाले होते. त्याच्याशी तुलना करता १९६४ सालचे उत्पादन नक्कीच उल्लेखनीय झाले. परंतु १९५२ ते १९६४ असा संपूर्ण कालावधी बघितल्यास चीनमधील शेती उत्पादनवाढीचा दर सामान्यतः भारतातील शेती उत्पादनवाढीच्या दराइतकाच राहिल्याचे दिसते.

चीनमधील घडामोडींचा ज्यांनी अभ्यास केला आहे, त्यांपैकी काहींनी तर या अंदाजाबद्दलच शंका व्यक्त केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे युद्धपूर्व काळातील उत्पादनाचे अंदाजी आकडे वास्तविक उत्पादनापेक्षा कमी होते, कारण सर्व उत्पादन मोजले गेले नव्हते. आणि, दुसऱ्या टोकाला, १९५७ च्या अधिकृत अंदाजापेक्षा १९६४ सालचे उत्पादन शेकडा १० ने वाढले हा दावाही त्यांना मान्य नाही. त्यांच्यापैकी काही जणांनी बांधलेले वैकल्पिक अंदाज अचूक मानले तर चीनमधील १९५२ पासूनच्या शेती उत्पादनवाढीचा वेग हा भारत आणि पाकिस्तान यांच्या मानाने कमी असला पाहिजे.

युद्धपूर्व काळातील उत्पादनाचे अंदाज वास्तविक उत्पादनापेक्षा कमी आहेत य निष्कर्षाच्या पुष्टयर्थ जी कारणे मांडली गेली आहेत ती बरीच सबळ आणि पटण्यासारखी आहेत. भारताच्या बाबतीतही वास्तविक उत्पादनापेक्षा अंदाज कमी बांधले गेले असा पुरावा आढळतो ही गोष्ट लक्षात घेता, वरील निष्कर्ष बरोबर असावा हे अधिकच पटते. परंतु १९६४ सालच्या उत्पादनाविषयीचे वैकल्पिक अंदाज स्वीकारण्याची घाई करून चालणार नाही. आज चीनमध्ये धान्योत्पादनाची पातळी कोणती आहे त्याविषयी कोणतेच विधान करण्याइतकी आपणास माहिती नाही. आपल्याला फक्त एवढेच दिसते की, दुर्मिळ अशी परकीय हुंडणावळ चीन सातत्याने अन्नधान्याच्या मोठ्या प्रमाणावरील आयातीकरिता खर्च करत आहे. (१९६४ सालीही चीनने ५ दशलक्ष टनांहून अधिक धान्य आयात केले.) त्या अर्थी अद्यापही चीन अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी नाही इतके खात्रीपूर्वक म्हणता येते. तेव्हा, अधिकृत आकडेवारीचा डोळे झाकून स्वीकार केल्यास निष्पन्न होणाऱ्या उत्पादन-वाढीच्या दरापेक्षा प्रत्यक्षातील दर हा कमी असावा; तरीपण, म्हणून, अधिक शंकेखोर अंदाज, आजच्याहून जास्त भक्कम पुराव्याअभावी, ग्राह्य धरणे शहाण-पणाचे होणार नाही.

महत्त्वाची गोष्ट ही की, उत्पादनवाढीच्या दराविषयीचे चीनला अनुकूल असलेले अंदाज स्वीकारले आणि औद्योगिक विकासाचा उच्च दर जमेस धरला तरीही, गेल्या १५ वर्षांतील चीनच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर भारतापेक्षा फार जास्त होता हे असंभवनीय दिसते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर या काळात दरसाल ३½ टक्के होता. हा दर चीनमध्ये ४½ ते ५ यापेक्षा जास्त नसावा. पण जर शेती उत्पादनातील वाढ अंदाजापेक्षा प्रत्यक्षात कमी असेल तर राष्ट्रीय उत्पा-दनवाढीचा दर नक्कीच वरच्यापेक्षाही कमी असणार.

खरे पाहू गेले असता, या काळातील राष्ट्रीय उत्पादनातील सापेक्षतः मंदगतीने झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर चीनचे इतर यश मनात अधिक ठसते. चीनने अतिशय अल्प अशी परकीय मदत घेऊन वाढीचा हा दर साधला आहे. इतकेच नव्हे तर, गेल्या पाच वर्षांत राजकीय आणि आर्थिक स्वरूपाच्या परकीय दडपणांना त्याने यशस्वीरीत्या तोंड दिले आहे. परकीय कर्ज परत करायचे शिल्लक ठेवले


**शिलंगणाचे सोने**

ब. मो. पुरंदरे

आवृत्ती समाप्त

नाही असे चीन बहुधा एकच विकसनशील राष्ट्र दिसते. (उलट ज्या काही राष्ट्रांना चीनने मदत केली आहे अशा राष्ट्रांकडून चीनला काही येणेच असेल.) विकसनशील राष्ट्रांत चीनचे एक असे उत्तम उदाहरण आहे की, ज्या राष्ट्राने विकासाचा वेग वाढविण्याकरिता मर्यादित काळ परकीय मदत घेतली पण पुढे मदत घेणे बंद केले (काही अंशी नाइलाजाने आणि काही अंशी स्वखुषीने); तसेच, आपले कर्ज अल्पावधीत परत केले, ही गोष्ट खचितच चीनला भूषणावह आहे.

चीनला परकीय मदत किती मिळाली या विषयी निश्चित माहिती मिळत नाही, पण हे निश्चित की त्याला मिळालेली (आर्थिक आणि लष्करी) मदत २०० कोटी डॉलरपेक्षा फारशी जास्त नव्हती. मदतीचा खालचा अंदाज १५० कोटी डॉलरचा आहे. ही मदत १९५० नंतरच्या काही वर्षांत मिळाली. त्यातला काही भाग कोरियन युद्धाकरिता मिळाला. १९५५ च्या सुमाराला ही मदत बंद झाली.

या कालावधीत चीनला मिळालेल्या एकूण साहाय्याचा ही मदत अर्थातच फक्त एक भाग आहे. चीनच्या आर्थिक विकासाला दुसरे आणि तितकेच महत्त्वाचे साहाय्य व्यापारातील जलद वाढीने झाले. अनुकूल परिस्थितीत काही वेळा व्यापार हा मदतीची जागा कशी घेऊ शकतो याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

चीनच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षात, १९५२ साली, चीनचे परदेशी निर्यातीपासूनचे एकूण उत्पन्न ९ कोटी डॉलरपेक्षाही कमीच होते. १९५०-५२ सुमारास भारताचे निर्यात उत्पन्न यापेक्षा पन्नास टक्क्यांनी अधिक होते. चीनचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त होते, म्हणजेच त्याचे परदेशी निर्यातीचे उत्पन्न राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण म्हणून भारतापेक्षा कमी होते. परदेशी चलनाच्या मिळकतीच्या आधारावर बघितले तरी आयात करण्याची चीनची कुवत भारतापेक्षा, निव्वळ रक्कमेच्या परिमाणातही, बरीच कमी होती.

परंतु नंतरच्या काही वर्षांच्या काळात चीनची निर्यात अतिशय जलदीने वाढली. १९५६ मध्ये १६ कोट डॉलरपेक्षा जास्त निर्यात झाली. १९५९ साली निर्यात उत्पन्न २२ कोटी डॉलरवर गेले. भारतात मात्र निर्यात उत्पन्न वाढले नाही. १९५० ते ६० या काळात ते 'जैसे थे' राहिले.

या काळात चीनच्या निर्यातीत जी वाढ झाली त्यापैकी बरीच मोठी वाढ रशिया आणि इतर साम्यवादी देशांशी चालणाऱ्या व्यापारात झाली. १९५२ मध्ये या देशांपासूनचे निर्यात उत्पन्न ६ कोटी डॉलर होते, ते १९५९ मध्ये जवळजवळ १६ कोटी डॉलरपर्यंत वाढले. (हे वाढलेले उत्पन्न एकूण निर्यात उत्पन्नवाढीच्या ३/४ होते) ह्यामुळे चीनला या देशांकडून बऱ्याच प्रमाणात आयात करता येऊ लागली. अशा प्रकारे मदतीची जागा व्यापार फार मोठ्या प्रमाणात घेऊ शकला.



**चीन आज ऋणमुक्त आहे.**

चीनला प्रारंभीच्या वर्षांत मिळणारी मदत ही व्यापारी हुंडीच्या स्वरूपात देण्यात आली. निर्यातीपेक्षा जास्त होणाऱ्या आयातीने जी तूट निर्माण होत असे ती भरून काढण्याकरिता या कर्जाचा उपयोग केला जाई. हे कर्ज दहा वर्षांच्या मुदतीचे होते. या कर्जाचा वापर आणि परतफेड हे प्रश्न फारसे अवघड झाले नाहीत, कारण चीनच्या निर्यात मालाकरिता मोठी आणि वाढती बाजारपेठ रशियाने खुली करून दिली.

या काळात मदत आणि वाढता व्यापार यांपासून मिळणारी परदेशी हुंडणावळ चीनने कशी वापरली हे पाहिले तर त्या नंतरच्या काळात इतक्या प्रमाणात स्वावलंबन कसे साधले हे कळून येते. या दहा वर्षांतील आयातीचा १/३ भाग यंत्रे आणि यंत्रसामग्रीचा होता. काही वर्षांत, उदाहरणार्थ १९५९ मध्ये, हा भाग २/५ हून जास्त होता. अधिक महत्त्वाची गोष्ट अशी की, या आयातीचा उपयोग अवजड, मोठी यंत्रे व मध्यम अर्धसंस्कारित उत्पादक वस्तू यांची निर्मिती चीनमध्येच सुरू करण्यासाठी कारखाने उभारण्यासाठी करण्यात आला. या कारखान्यांतून लवकरच बऱ्याच प्रमाणावर यंत्रसामग्री व इतर साहित्य यांचे उत्पादन चीनने सुरू केले. त्यामुळे पुढील विकासासाठी उत्पादक वस्तूंच्या आयातीवर अवलंबून राहण्याची गरज खूप कमी झाली.

देशात यंत्रसामग्री तयार करण्यासाठी कारखाने उभारण्याचे उद्दिष्ट गाठण्याकरिता चीनने जे धोरण अवलंबले ते पाहण्यासारखे आहे. आयातीचा मोठा भाग अशा कारखान्यांसाठी लागणाऱ्या यंत्रांसाठी बाजूला काढूनच चीन थांबला नाही,

तर वेळ वाचविण्याच्या दृष्टीने पूर्ण, 'तयार' कारखान्यांची आयात सुरुवातीस चीनने केली. **प्रोफेसर अॅलेक्झांडर एक्स्टाइन यांच्या म्हणण्याप्रमाणे अशा पूर्ण कारखान्यांच्या आयातीला चीनच्या औद्योगिक विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे.**

या संपूर्ण कारखान्यांच्या आयातीबरोबरच चीनने यंत्रनिर्मितीसाठी आवश्यक ते तंत्रविद्यात्मक कौशल्य आणि कारखानदारी यांचा विकास केला. चीनच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत आपल्याला हे दुहेरी धोरण स्पष्ट दिसून येते.

यासाठी केलेल्या गुंतवणुकीचे प्रमाण किती याचे सरकारी अविकृत आकडे मिळत नाहीत. अलीकडे एका जपानी अर्थशास्त्रज्ञाने केलेल्या अंदाजाप्रमाणे चीनच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकूण भांडवली स्वरूपाच्या गुंतवणुकीपैकी ५ टक्के भाग यंत्रोत्पादक उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठी वापरला गेला. यंत्रोत्पादनासाठी लागणारे मध्यम अर्ध–संस्कारित वस्तू उत्पादन करणारे पूरक उद्योगधंदे यात धरले ( पोलाद वगैरेसारखे ) तर हे प्रमाण आणखीसुद्धा वाढेल.

चीनच्या दुसऱ्या योजनेतही यंत्रोत्पादनावर अधिक भर दिला गेला. परंतु संपूर्ण कारखाना आयात करण्यावरील भर कमी करून परकीय मदत न घेता स्वतंत्रपणे यंत्रे आणि जरूर ती उपकरणे यांच्या संपूर्ण संचाचे आराखडे बनविणे आणि त्यांचे उत्पादन करणे यावर भर दिला गेला. १९६० साली रशियाबरोबर चीनचे भांडण झाल्यापासून तर या कार्यक्रमावर विशेषच भर दिला गेला.

परिणामी, उद्योगधंद्यांच्या यंत्रसामग्रीनिर्मितीच्या विभागात चीनने केलेली प्रगती फार भरीव व आश्चर्यकारक स्वरूपाची आहे. आज परकीय दडपणापुढे न दबता, प्रतिकूल परिस्थितीतही, चीनने आपली औद्योगिक वाढ चालू ठेवली आहे याचे रहस्य या क्षेत्रात मारलेल्या आघाडीत आहे. अलीकडच्या वर्षांत चीनमधील भांडवल गुंतवणुकीचा दर 'मोठ्या आगे छलांग'च्या वेळच्या गुंतवणुकीच्या दरापेक्षा कमी आहे. परंतु तो समस्त राष्ट्रीय उत्पन्नाच्या शेकडा २० पेक्षा अद्याप खाली गेलेला नाही. देशामध्येच निर्माण केलेल्या यंत्रसामग्रीच्या साहाय्याने गुंतवणुकीचा वेग टिकविणे चीनला शक्य झाले आहे. अलीकडच्या वर्षांत चीनच्या एकूण आयातीपैकी फक्त १/१० भाग यंत्रसामग्रीच्या आयातीसाठी वापरला जातो.

**चीनमध्ये केवळ संख्येच्या दृष्टीनेच विपुल यंत्रोत्पादन केले जाते असे नाही तर यंत्रांचा दर्जाही सुधारला आहे.** "१२,००० टनांचा हैड्रॉलिक फोर्जिंग प्रेस हा चीनच्या आधुनिक यंत्रोत्पादनातील एक मानबिंदू आहे. या फोर्जिंग प्रेसच्या सहाय्याने शांघायमध्ये १९६५ सालच्या मार्च महिन्यात उत्पादन सुरू झाले. अशा प्रकारचे फोर्जिंग प्रेसेस सर्व जगात फक्त सुमारे २० आहेत. अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, चेकोस्लोवाकिया या देशांतच फक्त त्यांचे आजवर उत्पादन केले गेले आहे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट ही की आज चीन अत्यंत अचूक काम देणारी हाय-प्रिसिजन मोठी



तयार कारखानेच उचलले

यंत्रे निर्माण करू शकतो. १२,००० टनांचा हैड्रॉलिक प्रेस हे त्याचे एक उदाहरण आहे. इतर विशेष उल्लेखनीय कामगिरीमध्ये ७२,५०० किलोवॅट वीज निर्माण करणारी वाफेवर चालणारी टर्बाइन्स, १,१५० मिलीमिटर व्यासाचा रोलर असलेली ब्लुमिंग मशीन्स, वर्षाकाठी १५,०००,००० टन लोखंडाचे उत्पादन करणारी लोखंड शुद्धीकरणाच्या कारखान्यास लागणारी यंत्रसामग्री, यांच्या उत्पादनाचा समावेश होतो. गेल्या काही वर्षांत चीनने केलेल्या नेत्रदीपक कामात १० लाख टन तेल शुद्ध करणारे तेलशुद्धी कारखाने आणि १ लक्ष टन नत्रयुक्त रासायनिक खते प्रतिवर्षी निर्माण करणारे कारखाने यांची उभारणी पण गणली पाहिजे. तंत्रविद्येतील प्रगल्भतेबद्दल बोलायचे झाले तर इलेक्ट्रॉनिक डोर्नार्डो वेल्डिंग, राऊंड आर्क गियर, इलेक्ट्रिकल प्रोसेसिंगची तंत्रे आणि पावडर मेटॅलर्जी यांसारख्या उच्च तंत्रांचा उपयोग विस्तृत प्रमाणात होऊ लागला आहे."– ['हॅरॉल्ड मुंथे– चायनाज मेकॅनिकल हरि'–फार इस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू, २० मे १९६५.]


या बाबतीत भारत व चीन यांची तुलना कशी होते होते ते आपण पाहू. भांडवली वस्तूंची देशातच निर्मिती करण्याचे, यंत्रोत्पादक उद्योगधंद्यांना उच्च अग्रक्रम देण्याचे धोरण भारताने १९५६ नंतर स्वीकारले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कच्च्या आराखड्यात प्राध्यापक महालनोबीस लिहितात, "मोठी यंत्र निर्माण करणाऱ्या उद्योगधंद्याचे महत्त्व इतके आहे की, जरूर पडल्यास पोलाद, कोळसा वाहतूक यांच्याविषयीची ठरविलेली उद्दिष्टे थोडी बाजूला सारून या उद्योगधंद्याला अधिक प्राधान्य दिले पाहिजे. कारण ४ ते ५ वर्षांच्या अवधीनंतर त्यामुळे औद्योगीकरणाच्या वाढीला जोराचा वेग येईल." यावरून, यंत्रोत्पादक उद्योगधंद्याचे आर्थिक भरभराटीच्या

दृष्टीने असलेले महत्त्व पूणपणे लक्षात आलेले होते ही गोष्ट स्पष्ट आहे. असे असूनही गेल्या दहा वर्षांत या उद्योगधंद्याच्या क्षेत्रात भारताने केलेली प्रगती मर्यादित स्वरूपाची आहे. विशेषत:, चीनने या कालावधीत या क्षेत्रात केलेल्या घोडदौडीपुढे भारताची कामगिरी फार सामान्य दिसते

भारताने या क्षेत्रात वाटचालीला उशीरा सुरुवात केली हे तर खरेच. शिवाय, दुसऱ्या योजनेत एकूण गुंतवणुकीपैकी फक्त २ टक्के गुंतवणूक या यंत्रोत्पादक उद्योगधंद्यांमध्ये केली गेली (चीनची गुंतवणूक पहिल्या योजनेत ५ टक्के होती) हेही त्याचे एक कारण आहे. चीनप्रमाणे राजकीय कारणांसाठी स्वयंपूर्ण होण्याची निकड भारताला नव्हती व म्हणून गुंतवणूकीचे प्रमाण कमी राहिले ही गोष्ट आपण समजू शकतो. परंतु दुसऱ्या आणि तिसऱ्या योजनेत याकरिता जेवढी रक्कम राखून ठेवली होती तीसुद्धा पूर्णपणे वापरली गेली नाही याचे मात्र समाधानकारक-रीत्या स्पष्टीकरण होऊ शकत नाही.

या योजनांच्या अंमलबजावणीचा तपशील पाहिला तर असे दिसते की इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा **यंत्रोत्पादक उद्योगधंद्याच्या क्षेत्रात योजित रकमेच्या वापरा-बाबत सर्वांत जास्त उपेक्षा झाली.** छोटी यंत्रे आणि यंत्रसामग्री निर्माण करणारे उद्योगधंदे आणि मोठी अवजड यंत्रे निर्माण करणारे उद्योगधंदे या दोघांची जर तुलना केली तर असे दिसते की, जी काही थोडीफार प्रगती नोंदविली गेली ती बहुतेक करून लहान यंत्रोत्पादक उद्योगधंद्यांतच. १९६५–६६ या वर्षात मोठ्या यंत्रोत्पादक धंद्यातील उत्पादनाची पातळी ही काहीच वर्षांपूर्वी १९६५–६६ साली जी पातळी गाठता येईल असे वाटले होते तिच्या तुलनेत, केवळ अंशमात्र होती. त्यामुळे, भारताला अजूनही त्याच्या यंत्रसामग्रीच्या एकूण आवश्यकतेच्या २/५ भागासाठी (कदाचित १/२ भागही असेल) आयातीवर अवलंबून राहावे लागते यात काही आश्चर्य नाही.

यंत्रोत्पादनाचा कार्यक्रम भारतात शंभर टक्के पार पडू न शकण्याची काही अपरिहार्य कारणे असू शकतील. उदाहरणार्थ, प्रकल्पाचा आराखडा व पूर्वतयारी अहवाल तयार करण्यासाठी अपेक्षेपेक्षा जास्त वेळ मोडणे, भांडवल; तंत्रकौशल्य, इत्यादी बाबींची पूर्तता होण्यास कालावधी लागणे, इ. कारणे असू शकतील. पण यंत्रोत्पादनाचा कार्यक्रम अधुराच पडण्याचे एक महत्त्वाचे कारण असे दिसते की, **दुर्मिळ परदेशी चलनाकरिता झालेल्या चढाओढीत उच्च नफा देण्याचे प्रलोभन दाखविणाऱ्या खाजगी क्षेत्रातील उद्योगधंद्यांनी परदेशी चलन आपल्याकडे खेचून घेतले, आणि ठरवून दिलेल्या अग्रक्रमानुसारच साधनसंपत्तीचा प्रत्यक्ष विनियोग होईल हे धोरण राबविण्याची ताकद नियोजन यंत्रणेत नव्हती. अशा प्रकारे, यंत्रो-त्पादनाच्या कार्यक्रमाची पूर्तता गंभीर प्रमाणात होऊ शकलेली नसताना, त्याच वेळी रेयॉन, साखर, प्लॅस्टिकच्या वस्तू, यासारख्या अग्रक्रमाच्या यादीत पुष्कळ खाली**



प्रबळ उद्योगपती : दुबळे शासन

**असलेल्या, किंवा अजिबात नसलेल्या, कितीतरी उद्योगधंद्यांना अत्यंत चणचणीच्या काळातही परदेशी चलन मिळविण्यात यश आले आणि नियोजित लक्ष्यांपेक्षाही त्यांचे उत्पादन जास्त झाले.**

भांडवली वस्तू व यंत्रे निर्माण करणारे उद्योग उभारण्यात प्रगतीचा वेग चीन-मध्ये मोठा असण्याचे कारण असे दिले जाते की, भारतात शक्य होती त्यापेक्षा कितीतरी जास्त दराने देशान्तर्गत बचत चीनने या काळात सक्तीने करायला लावून गुंतवणुकीचा दर कायम ठेवला. पण या प्रतिपादनात थोडेफार सत्य असले तरी, दोन देशांतली बचत आणि गुंतवणूक यांच्या दरातील वास्तविक फरक फार नाही.

१९५० नंतरच्या काळात चीनमध्ये शेतमालाच्या किमतींच्या तुलनेत औद्योगिक भांडवली वस्तूंच्या किमती सापेक्षतः जास्त राहिल्याने एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील भांडवली विनियोगाचे प्रमाण, वास्तविक आहे त्यापेक्षा, जास्त 'फुगलेले' दिसते. १९५२ सालच्या किमतींमध्ये मोजल्यास एकूण राष्ट्रीय खर्चाशी एकूण भांडवली विनियोगाचे प्रमाण १९५२ मध्ये १९ टक्के व १९५७ मध्ये २६ टक्के इतके जास्त दिसते. परंतु १९३३ सालच्या सापेक्ष किमतींमध्ये मोजल्यास हे प्रमाण १९५२ साली सुमारे १०½ टक्के व १९५७ साली १५ टक्क्यांहून कमी इतके येते. 'आगे छलांग'च्या काळात गुंतवणुकीचे प्रमाण बरेच वाढले होते यात काहीच शंका नाही. परंतु हे शक्य आहे की, भारतातील त्या वेळच्या सापेक्ष किमतीमध्ये मोजल्यास तेवढ्या गुंतवणुकीसाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या २० टक्क्यांपेक्षा जास्त बचत करण्याची

जरुरी नव्हती. शिवाय, १९६० पासून चीनमधील गुंतवणुकीचा दर १९५७ च्या पातळीवर, किंबहुना त्यापेक्षाही खालच्या पातळीवर, आला आहे.

दुसऱ्या बाजूला, भारतातील बचत व गुंतवणूक यांचे दर सर्वसाधारणपणे धरले जातात त्यापेक्षा प्रत्यक्षात थोडे जास्तच आहेत, असे मानण्यास जागा आहे. खेडयापाडयातून केल्या जाणाऱ्या आर्थिक गुंतवणुकीमागची बचत जर जमेस धरली तर एकूण राष्ट्रीय बचत १९५०–५२ च्या सुमारालासुद्धा राष्ट्रीय उत्पन्नाच्या ९ टक्क्यांहून अधिक होती. १९६२ च्या सुमारास तिचे प्रमाण सुमारे १२ टक्के होते. शिवाय, या काळात भारताला परकीय मदतीचा बऱ्याच प्रमाणात फायदा मिळत होता. तेव्हा १९५० च्या नंतरच्या काही वर्षांत भारतात सर्वसाधारण गुंतवणुकीचा दर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा खाली बहुतांशी कधीच नव्हता, आणि १९६० च्या सुमाराला तो १५ टक्क्यांपेक्षा अधिक झाला असे म्हणता येते.

हातात असलेल्या साधनांचा उपयोग कोणत्या गोष्टींसाठी केला जातो याकडे जर लक्ष दिले तर या दोन देशांत आपल्याला बराच महत्त्वाचा फरक दिसतो. भारतात आर्थिक उत्पन्नाची विभागणी अत्यंत विषम आहे, तसेच भारतीय अर्थ-व्यवस्था बऱ्याच अंशी खुल्या बाजारपेठेच्या प्रभावाखाली कार्य करते, त्यामुळे ज्या उद्योगधंद्यांना अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या दृष्टीने काही महत्त्व नाही अशा उद्योग-धंद्यांसाठी गुंतवणुकीसाठी हातात असलेल्या साधनांपैकी मोठा भाग प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणे उपयोगात आणला गेला ही गोष्ट उघड आहे. चीनमध्ये अशा प्रकारे होणारी नासाडी थांबविण्यासाठी आर्थिक उत्पन्नाची समविभागणी आणि गुंतवणकी-वरील कडक निर्बंध यांचा उपयोग झाला असावा.

**दुर्मिळ साधनसंपत्तीला भारतात अनेक मार्गांनी गळती लागलेली दिसते.** बचतीचा मोठा भाग खाजगी अलिशान घरे बांधण्यात गुंतविला गेला आहे. टिकाऊ उपभोग्य वस्तू आणि तातडी नसलेल्या (नॉन–इसेन्शियल) इतर वस्तू यांना असलेल्या तेज मागणीमुळे या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत बरीच गुंतवणूक झाली आहे. आयातीवरील निर्बंध आणि देशातील बाजारपेठेतील वाढती मागणी यामुळे या वस्तूंच्या किंमती वाजवीपेक्षा बऱ्याच वर गेल्या आहेत आणि त्यांच्या उत्पादनापासून मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यांच्या उत्पा-दनाकरिता जी यंत्रसामग्री व ज्या मध्यम, अर्ध-संस्कारित वस्तू लागतात त्या एकतर देशात तयार कराव्या लागतात अगर आयात कराव्या लागतात. कसेही केले तरी, त्यामुळे आधीच तुटपुंजी असलेली साधनसामग्री खर्च केली जाते. या वस्तूंच्या उत्पादनासाठी भारतीय अर्थव्यवस्थेला करावा लागणारा परदेशी चलनाचा सगळा खर्च मोजला–'अनावश्यक' वस्तूंवरील प्रत्यक्ष खर्च, त्याचप्रमाणे त्यांच्या उत्पादना-साठी लागणाऱ्या मध्यम व भांडवली वस्तूंवरील अप्रत्यक्ष खर्च–आणि परदेशी चलनाच्या खर्चात या वस्तूंच्या उत्पादनासाठी करावी लागणारी आयात आणि या



**मिळकत अशी उडवली !**

वस्तूंच्या उत्पादनासाठी खर्ची पडलेली पण एरवी निर्यात वाढीसाठी कामी येऊ शकली असती ती स्वकीय साधनसंपत्ती समाविष्ट केली तर २०० कोटी रुपयांहून अधिक खर्च दरवर्षी यावर होत असल्याचे निष्पन्न होईल. हा खर्च देशाच्या एकूण आयात मिळकतीचा १/८ भाग आहे. [ १९६४ सालात देशातच वापरण्यासाठी उच्च प्रतीचे तलम कापड तयार करण्याकरिता लागणाऱ्या कापसाची सुमारे ५० कोटी रुपयांची आयात झाली. सूत, लगदा, रसायने ह्या कृत्रिम रेशीम उत्पादनासाठी लागणाऱ्या वस्तू २२ कोटी रुपयांच्या आयात केल्या गल्या. १९६४ सालात प्लास्टिक वस्तू, प्रसाधने, पोलादी फर्निचर, रेफ्रिजरेटर्स, वातानुकूलन यंत्रे, विजेची उपकरणे अशा उघडच ‘ अनावश्यक ’ वस्तूंच्या समस्त उत्पादनाचे मूल्य ५० कोटी रुपयांहून कमी नव्हते. ह्यांपैकी १/३ ते १/२ रक्कम परकीय हुंडणावळीवर खर्च केली गेली. सधन वर्गाच्या उपभोग्य वस्तूंवरच्या खर्चाची पाहणी केली तर ही यादी आणखी बरीच मोठी होईल. ऐषआरामी घरे बांधण्यासाठी कामी आलेल्या सिमेंट आणि पोलाद यांचा खर्चही मोजायला हवा. त्याचप्रमाणे वाहतुकीच्या आरामशीर साधनांवर खर्च झालेली परकीय हुंडणावळही धरली पाहिजे. खेरीज या सधन वर्गाकडून येणारी मागणी पुरविण्यासाठी विविध मध्यम, अर्धसंस्कारित आणि भांडवली वस्तूंवर झालेली गुंतवणूकही लक्षात घ्यायला हवी. ह्यावरून दरवर्षी २०० कोटी रुपयांच्या परकीय चलनाचा गैरवापर होत असल्याचा जो अंदाज केला आहे तो अवास्तव आहे असे दिसत नाही.] .

अन्नधान्याच्या बाबतीत चीनपेक्षा भारत आयातीवर फार अधिक प्रमाणात अवलंबून आहे. १९६०–६२ पर्यंतच्या काळात चीन बऱ्याच मोठ्या प्रमाणात

अन्नधान्य निर्यात करून १५ ते २० कोटी डॉलर प्रतिवर्षी मिळवत होता. त्यानंतरच्या काळात मात्र चीनला अन्नधान्य सतत आयात करावे लागत आहे. तरीही, अत्यंत वाईट, दुष्काळी काळातली चीनची अन्नधान्याची आयात पाहिली तर चांगल्या वर्षातल्या उच्चांकाच्या उत्पादनाच्या फक्त ३ टक्क्यांइतकी आयात केल्याचे दिसते. ह्या उलट चांगल्या हंगामाच्या वर्षातही भारताची आयात उत्पादनाच्या सुमारे ५ टक्के इतकी होत राहिली आहे, आणि १९६५–६६ या वर्षातली आयात त्याच्या जवळपास २½ पट होती. **आयातीवरील आपल्या जादा अवलंबनाचे, जरुरीपेक्षा कमी उत्पादन, हे केवळ आंशिक स्पष्टीकरण होऊ शकेल; अन्नधान्याच्या वाटपाची जी व्यवस्था भारतात कार्यकारी आहे तिच्या मर्यादा हे अधिक समर्पक स्पष्टीकरण होईल.**

भांडवली गुंतवणुकीच्या कार्यक्रमाच्या पूर्ततेसाठी यंत्रसामग्रीची मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते, आर्थिक विकासाच्या दृष्टीने आज 'अनावश्यक' असलेल्या वस्तूंच्या मागणीपोटी परदेशी चलनाची नासाडी होते, परदेशातून अन्नधान्य वाढत्या प्रमाणावर आणावे लागत आहे, या सर्वांचा परिणाम म्हणून अलिकडे भारताच्या आयातनिर्यात व्यापाराच्या व्यवहारात मोठी तूट येत आहे. त्यामुळे भारताची पुढील प्रगती सातत्याने परकीय मदत मिळविण्यावरच सर्वस्वी अवलंबून राहणार आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमाण म्हणून पाहता पाकिस्तानच्या तुलनेत ही तूट सापेक्षतः कमी आहे, नाही असे नाही. परंतु भारताच्या एकूण विराट विस्तारामुळे, शेवटी लागणारी मदतीची निव्वळ रक्कम फार मोठी होते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत भारताने विकासाच्या कार्यक्रमासाठी एकूण ३०० कोटी डॉलर, पी. एल्. ४८० खाली अन्नधान्य आणि कापूस आयातीसाठी २०० कोटी डॉलर, १०० कोटी डॉलर कर्जफेडीपायी, अशी एकूण ६०० कोटी डॉलर मदत वापरली. चौथ्या योजनेसाठी आताच्या अंदाजाप्रमाणे विकास–कार्यक्रमासाठी ५०० कोटी डॉलर व कर्जफेडीसाठी ३०० कोटी डॉलर मदत लागेल. अन्नधान्य, कापूस यांच्या आयातीसाठी किती मदत लागेल त्याविषयीचा अंदाज अद्याप निश्चित व्हावयाचा आहे. (देशातील यंत्रांचे उत्पादन योजनेच्या काळात तिप्पट होईल आणि त्यामुळे आयातीवरील अवलंबन कमी होईल असे मदतविषयक अंदाज बांधताना गृहीत धरलेले आहे. परंतु ही अपेक्षा, पूर्वीचा अनुभव लक्षात घेता फाजील आशावादी वाटते.) **तेव्हा, चौथ्या योजनेत परकीय मदतीचा आकडा प्रत्यक्षात १००० कोटी डॉलरच्या जवळपास गेल्यास नवल नाही.**

**परकीय मदतीवर इतक्या प्रचंड प्रमाणावर अवलंबून राहणाऱ्या देशांना अनिश्चितपणाचा धोका पत्करावा लागतो हे अलीकडे अधिकाधिक स्पष्ट होत चालले आहे. इतरही प्रकारच्या दडपणांपुढे देश दुर्बळ बनण्याचा धोका निर्माण होतो हे वेगळेच.** एकतर आवश्यक असलेल्या प्रमाणात ही मदत मिळत राहील,

असे आश्वासन नाही. पूर्वी जे देश भारताला मदत करत होते त्या देशांच्या स्वतः-च्याच आंतरराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या व्यवहारात सध्या गंभीर तुटीची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या त्या देशांकडून मागासलेल्या देशांना मिळणाऱ्या मदतीत नजीकच्या काळात काही विशेष वाढ होईल असे दिसत नाही. मदत मागणाऱ्या राष्ट्रांचा आकडाही वाढला आहे, आणि मदत दिली जाते ती केवळ आर्थिक गरजेचा विचार करून दिली जात नाही, तर त्या मदतीची सांगड अनेक राजकीय उद्दिष्टांशी घातली जात असल्याने, भारताला पूर्वीप्रमाणे वाढत्या प्रमाणात मदत मिळत राहील हे शक्य नाही.

मोठ्या प्रमाणावर मिळणाऱ्या आर्थिक मदतीतून दीर्घकाळ टिकणारी कर्ज-फेडीची समस्या निर्माण होते. दरसाल भारताच्या निर्यात मिळकतीचा २० टक्के भाग आजच कर्जफेडीपोटी जात आहे. प्राथमिक स्वरूपाच्या अंदाजाप्रमाणे १९७०–७१ साली ही रक्कम आताच्या दुप्पट होईल. म्हणजे, चौथ्या योजनेत गृहीत धरल्याप्रमाणे भारताची निर्यात मिळकत जरी ५० टक्क्यांनी वाढली तरी, कर्जफेडीपोटी १/३ निर्यातउत्पन्न बाजूला काढून ठेवावे लागणार आहे. कर्जफेड आणि योजनेसाठीची आयात दोन्ही मिळून होणारी रक्कम भविष्यातील अपेक्षित निर्यातीच्या दुप्पट होते. शिवाय, निर्यात मिळकत अमुक दराने वाढेल हा अंदाज काहीसा अनिश्चित आहे. त्यातच, देशाला लागणारी मदत यापुढे दीर्घ मुदतो-करिता स्वतःस कोणत्याही प्रकारे बांधून घेण्यास नाखूष असलेल्या राष्ट्रांबरोबर प्रतिवर्षी वाटाघाटी करून मिळवावी लागणार आहे. याचा अर्थ असा की, भार-ताची परिस्थिती अत्यंत नाजूक, दुबळी आणि अडचणीची होईल हे उघड आहे.

भारताची परकीय मदतीची गरज आज खूप मोठी झाली आहे. मदतीवरील परावलंबन संपविण्याची जी कालमर्यादा नियोजित केली होती तीही कळत-नकळत पुढे पुढे ढकलली जात आहे. दुसऱ्या योजनेच्या सुरुवातीच्या काळात असे मानले गेले आहे की, प्रचंड प्रमाणावरील परकीय साहाय्य फक्त दहा वर्षांकरिताच आव-श्यक होते. पुढील उताऱ्यावरून हे स्पष्ट होईल :

"दुसऱ्या व तिसऱ्या योजनेच्या काळातील गुंतवणूक ही नंतरच्या काळातील गुंतवणुकीच्या गरजेच्या मानाने तौलनिकदृष्ट्या बरीच अधिक आहे. ही दहा वर्षे पुढील प्रगतीचा मार्ग ठरण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली पाहिजेत. जीवनमान आणि बचतीचे सामर्थ्य कमी आहे अशा वेळी विकासाच्या मार्गातील 'बिकट चढण' ओलांडण्यासाठी देशातील साधनसंपत्तीला पूरक म्हणून परकीय मदत अत्यंत आवश्यक आहे." [प्लॅनिंग कमिशन, सेकंड फाइव्ह इयर प्लॅन, पृ. ११.]

दुसऱ्या योजनेच्या काळात जो अनुभव आला त्यामुळे ह्यात थोडासा बदल झाला. तिसऱ्या योजनेच्या पुस्तकात असे म्हणण्यात आले की, 'आणखीन पुढील

दहा ते बारा वर्षे परकीय साहाय्य हे अत्यंत आवश्यक आहे.' त्यामुळे मदतीवरील परावलंबन संपविण्याचा काळ पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या मध्यकाळापर्यंत पुढे ढकलला गेला. आणि आता चौथ्या योजनेसाठी केलेल्या प्राथमिक स्वरूपाच्या अंदाजाप्रमाणे "अधिक आर्थिक वाढ घडवून आणण्यासाठी परकीय कर्जाच्या बोजात नक्त वाढ करावी लागणार नाही" असा काळ केव्हातरी येणार आहे.

भावी काळातील परकीय साहाय्याविषयीच्या भूमिकेत जे फेरबदल झालेले दिसतात ते अर्थातच परिस्थितीच्या दडपणामुळे करावे लागले आहेत. परंतु, हेही लक्षात घ्यायला पाहिजे की, विकास कार्यक्रमाच्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रातील नियोजनात आलेल्या अपयशातूनच बऱ्याच अंशी ही परिस्थिती निर्माण झाली आहे. उच्च मध्यमवर्गीय व सधन वर्गाच्या 'अनावश्यक' उपभोगापायी दुर्मिळ साधनसंपत्तीची होणारी नासाडी जर वेळीच थांबविली असती, मोठी यंत्रे उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांना सुरुवातीला दिलेला अग्रक्रम जर परिणामकारक रीतीने टिकवून धरला गेला असता, आणि अन्नधान्य वाटपाच्या व्यवस्थेत आयात पुरवठ्यावर अवलंबून राहण्याचा अंगभूत दोष नसता, तर आजच्यापेक्षा बऱ्याच कमी प्रमाणात परकीय मदतीची गरज लागली असती हे निःसंशय. अजूनही वर नमूद केलेले गंभीर दोष सुधारून परिस्थिती काबूत आणण्याचे दृष्टीने काही प्रयत्न केले जात आहेत असे दिसत नाही, आणि यामुळे भविष्यकाळातील अनुभव भूतकाळातील अनुभवापेक्षा फारसा वेगळा असेल असे मानणे अतिशय कठीण आहे.

भारतातील नियोजनाचा कल अलीकडे, स्पष्टपणे, तांत्रिक घटपटाकडे (टेक्नोक्रॅटिक एक्झरसाईज) होत असल्याचे दिसते. सामाजिक आणि राजकीय विचारसरणीत आणि संस्थांमध्ये क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणण्यावर चीन अतिरिक्त भर देत आहे असे दिसते, तर भारत दुसऱ्या टोकाला जाण्याचा प्रमाद करीत आहे. यामुळे देशातील उपलब्ध साधनसंपत्तीचे संघटन आणि वापर यांत अडथळे आणणाऱ्या संस्थात्मक घटकांकडे दुर्लक्ष केले जाते, किंबहुना त्यांना बगल दिली जाते, आणि विकास म्हणजे भांडवलाचा विनियोग करून जास्त उत्पादन मिळविणे होय एवढाच दृष्टिकोन ठेवला जातो. उत्पन्नवाटप आणि मालकीहक्कसंबंध यांतील सध्याच्या घाटामुळे साधनसंपत्तीची होणारी उधळपट्टी वरील दृष्टिकोनामुळे चालू राहते. इतकेच नव्हे तर, हा दृष्टिकोन या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेत परकीय साहाय्य चालू राहण्यात ज्यांचा फायदा आहे असे घटक नेमके दृढमूल करतो. मदतही बऱ्याच अंशी अशाच देशांकडून येत आहे की ज्यांची, समाजातले हे घटक पोसले जाऊन भारतात त्यांना हवी अशी आर्थिक व्यवस्था निर्माण व्हावी, अशी इच्छा आहे. भारताची अर्थव्यवस्था पाश्चिमात्य जगाशी घनिष्ठपणे जखडली जावी हा त्यातील एक भाग आहे. परकीय मदतीवरील अवलंबन लवकर संपुष्टात आणता येण्यासाठी प्रारंभीच्या काळात परकीय मदतीचा प्रचंड प्रमाणात उपयोग




तांत्रिक घटपट म्हणजे नियोजन !

करावा ही तात्त्विकदृष्ट्या भारतीय नियोजनामागची नीती (स्ट्रॅटेजी) असली तरी, प्रत्यक्षात मात्र देशांतर्गत जी साधनसंपत्ती वस्तुतः उभी करता येईल तिच्या जागीही परकीय मदत वापरली जात आहे. इतकेच नाही तर, आर्थिक धोरणे आपल्याला हवी तशी बदलून घेण्याचे मदत हे आज धनवान राष्ट्रांच्या हातातील हत्यार बनले आहे.

भारताचा विस्तार आणि आशियातील त्याचे मोक्याचे स्थान यामुळे किमान काही प्रमाणात भारताला परकीय मदत नक्कीच मिळत राहील. या मदतीचे प्रमाण गेल्या काही वर्षांपेक्षा कमी असेल, पण त्यापेक्षा फार कमी असणार नाही. दुसऱ्या बाजूला मदत किती व कोणाला द्यावयाची ही गोष्ट व्यापक राजकीयआर्थिक उद्दिष्टांच्या चौकटीत ठरत असल्याने मदत मिळविण्यासाठी भारत काहीही करायला तयार झाला तरी या मदतीला एक कमाल मर्यादा राहील. भारताचे राज्यकर्ते मानतात त्यापेक्षा वर उल्लेखिलेल्या परकीय मदतीच्या किमान व कमाल परिमाणातले अंतर खूप कमी आहे.

परकीय मदत किती मिळू शकेल याला असलेली मर्यादा लक्षात घेतली आणि देशांतर्गत गोळा करता येईल त्या साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त परिणामकारक उपयोग करण्यावर जर भारताने आपली सर्व शक्ती केंद्रित केली, तर अजूनही थोड्याच वर्षांत खूप प्रगती करता येण्यासारखी आहे. अधिक मोठ्या प्रमाणावर परकीय मदत उपलब्ध होण्यावर अवलंबून राहणाऱ्या धोरणातून होईल त्यापेक्षा ही प्रगती अधिक असेल. ह्याकरिता, गुंतवणुकीची मोठाली लक्ष्ये स्वीकारणे म्हणजे

धिटाईचे नियोजन करणे होय, ही आजची समज टाकून दिली पाहिजे. विकासाच्या वाटचालीत आवश्यक होऊन बसलेले संस्थात्मक आणि घटनात्मक बदल घडवून आणण्याची तयारी हे धिटाईचे लक्षण ठरले पाहिजे.

चीनलासुद्धा सध्या अतिशय ताण सहन करावा लागत आहे. काही अंशी त्याने केलेल्या धोरणविषयक चुका आणि काही अंशी गेल्या पंधरा वर्षांत त्याच्यावर पडलेला प्रचंड दबाव त्याला कारणीभूत आहे. रशिया अशाच प्रकारच्या संक्रमणातून जात असताना त्याला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागले त्यापेक्षा चीनच्या आजच्या समस्या अधिक कठीण नाहीत. चीनने आजपर्यंत ज्या धीराने आणि करारीपणाने समस्यांना तोंड दिले आहे त्यावरून, आजच्या या समस्यांवरही तो मात करील, असे म्हणणे योग्य होईल. कदाचित, रशियात जसा आकस्मिक बदल घडून आला तसा बदल चीनमध्येसुद्धा घडून येईल, आणि आज वाटत आहे त्यापेक्षा हा बदल कदाचित लौकरच घडून येईल, आणि जगाबरोबर चीनचे आज जे वितुष्टाचे संबंध आहेत ते सुधारतील अशी शक्यता आहे. तसे झाल्यास चीन आत्मविश्वासाने परराष्ट्रांशी आपल्या शर्तींवर मदत आणि व्यापार याविषयी बोलणी करू शकेल. चीनचा विकास भविष्यात अधिक सुकर व जलद होईल.

चीनशी तुलना करता भारताच्या कमजोरीचे कारण आर्थिक क्षेत्रातील भूतकालीन कामगिरीतील न्यून हे सर्वस्वी नाही. या दोन राष्ट्रांत आज जे अंतर आहे ते थोड्या काळातच भरून काढता येण्यासारखे आहे, हे आपण पाहिलेच आहे. या कमजोरीचे मुख्य कारण परकीय मदतीवरील अवलंबन कमी करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केल्यास ज्या लोकांचे हितसंबंध दुखावले जातील त्या लोकांचा राजकारणातला वाढता प्रभाव आणि सामर्थ्य हे होय. **राष्ट्रीय हितसंबंध व एका गटाचे हितसंबंध यातील संघर्षांची सोडवणूक मूलतः व प्रामुख्याने राजकीय पातळीवर केली पाहिजे. समस्येचे राजकीय स्वरूप स्पष्टपणे ओळखण्याची जरुरी आहे. समस्येला सरळ सरळ तोंड देण्याची तयारी पाहिजे केवळ विशेषज्ञ भूमिका (टेक्नोक्रटिक अॅप्रोच) आणि मोठी परकीय मदत या फॉर्म्युल्याने हा प्रश्न सुटू शकेल या समजुतीने या संघर्षाला बगल देऊन उपयोगी नाही.**

या समस्येचे जे राजकीय अंग आहे त्यातून निर्माण होणारे प्रश्न सोडविण्याची पात्रता एकट्या अर्थशास्त्रज्ञाजवळ नाही, किंवा त्या सर्व प्रश्नांवर अधिकारवाणीने तो भाष्यही करू शकणार नाही. परंतु आजच्या परिस्थितीत अर्थशास्त्रज्ञाचे हे कर्तव्य आहे की, सद्यःस्थितीत परकीय मदत मिळविण्याचा जो खटाटोप चालला आहे त्याचे, दुसरा कोणताही उपाय नाही म्हणून नव्हे तर, काहींना तो मार्ग सोपा वाटतो, हे कारण आहे हे त्याने स्पष्टपणे सांगितले पाहिजे. □

**[ 'समाजप्रबोधन पत्रिका' जून-जुलै : १९६८ : अंकावरून पुनर्मुद्रित ]**

तीन वर्षांत अन्नस्वावलंबन
ही
भारत सरकारची घोषणा

एक वर्षात—
गांधीजन्मशताब्दीपूर्वी
परकीय अन्नमदत
बंद झाली पाहिजे
हा आपला आग्रह.

# हा आग्रह आपण कसा व्यक्त करणार?

गांधीजींच्या ऋणातून
अंशतः मुक्त होण्यासाठी

?

# नारायण

## मनोहर भागवत

नारायणला जाऊन आता वर्ष होत आलं तरीदेखील त्याची आठवण माझ्या मनाच्या पडद्यावरून पुसून जात नाही.

जेव्हा जेव्हा मी आमच्या जुन्या बिऱ्हाडावरून जातो तेव्हा तेव्हा मला उगाचच भास होत राहतो की नारायण गॅलरीच्या कठड्याला टेकून उभा आहे. अंगात एक फाटका, मळका गंजिफ्रॉक नि खाकी अर्धी विजार, सडपातळ देहयष्टि नि उपकारांच्या ओझ्याखाली दडपलेली ती त्याची थिजलेली नजर, मला जणु वर येण्याची खूण करते आहे असं वाटतं. क्षणभर मी रस्त्यातच थबकतो नि भ्रमिष्टासारखा वर पाहत राहातो ..इतक्यात चाळीच्या जिन्याजवळून शीळ घातल्यासारखी मंजुळ साद येते.

"का काऽऽऽ"

मी वळून पाहतो. पोटाखाली घसरणारी अर्धी विजार सावरीत नारायणचा मुलगा दड् दड् जिना वाजवीत माझ्याकडे येण्याची घाई करीत असतो. जरासा उशीर झाला तर मी जणु पळूनच जाणार आहे अशी त्याला धास्ती वाटते म्हणूनच मला वाटतं तो रस्त्यातल्या वहानांची, गर्दीची पर्वा न करता जीव मुठीत घेऊन माझ्याकडे झेपावतो. त्याला असं धावताना पाहिलं की माझ्या पोटांत भीतीनं खड्डे पडतात नि काळजाचे ठोके चुकतात. हात-पायांना एकदम कापरं भरतं .. मनात येतं की याच्या बापासारखा यालाही कुठल्या मोटरचा धक्का बसला तर ..?

नुसत्या विचारानंच डोकं सुन्न होऊन जातं आणि अभावितपणं मीच रस्ता ओलांडून त्याच्या जवळ जात घाबऱ्या घाबऱ्या म्हणतो,

"विनूऽऽ विनूऽऽ थांब बाळा पडशीलना !"

मी एवढं म्हणेपर्यंत एका दमात सगळ्या पायऱ्या उतरून तो मला 'काका' 'काका' करीत बिलगतो आणि तोपर्यंत मोठ्या कष्टानं आवरलेले दुःखाचे कढ मला थोपविता येत नाहीत. या गोजिरवाण्या निष्पाप बालकाला उघड्या निक्षणाक्षणाला भेसूर बनत चाललेल्या जगात सोडून नारायण निघून गेला असल्याची



जाणीव काळजाला घरं पाडते. नारायण गॅलरीत उभा असल्याचा भास विनूला जवळ घेताच कापरासारखा उडून जातो नि नजर पुन्हा गॅलरीकडे वळते.

विनूची आई तिथं उभी असते. नजरेनंच विनूला दटावीत असते. खंगत चाललेलं शरीर...अंगावरची फाटकी वस्त्रं नि ते पांढरं फटफटीत कपाळ...क्षणभर तिथं नजर स्थिरावते तेवढ्यातच 'काय वरं आहेना?' 'ठीक' एवढं आमचं बोलणं नजरेनंच होतं कारण शब्दांची औपचारिक देवघेव करण्यासारखी मनस्थिती नसते. गिरीजावहिनीच्या पांढऱ्या कपाळाकडे नि मंगळसूत्राशिवाय दिसणाऱ्या भयाण देहाकडे पाहवतच नाही. लडिवाळपणे विनू 'काका, काका' म्हणत पायांना ढुशा देतच असतो. पाच–दहा पैशाचे चणे फुटाणे किंवा बिस्किटं अगर गोळ्या त्याच्या हातावर ठेवल्या की स्वारी खूप होते. आणि खारीसारख्या पटापट उड्या मारीत

तो जिना चढू लागतो. शेवटच्या पायरीला त्याचे पाय लागले की मकास मनानं मी पुढं जातो. वर नारायणच्या बिऱ्हाडांत जावं असं मला कधी वाटतच नाही. आणि वर जायचं तरी कशाला......?

दैन्याची कोळिष्टकं बसलेला गिरिजावहिनींचा संसार पाहायला? नारायण असताना मी तर शेजारी राहून ते दैन्य रोज पाहत होतो. दैन्यात...परिस्थितीचे चटके बसत असतानाही...एक वेळ घरात उपास पडत असूनही चेहऱ्यावरचं हास्य नि आजकाल दुर्मिळ होत असलेल्या निष्ठा कसलीही कुरकुर न करता जपणाऱ्या नारायणाचा शेजार मला लाभला होता. त्याच्या संसारातले उन्हाळे हिवाळे मी जवळून पाहिले होते.

सणासुदीला किंवा गिरणीचा बोनस मिळताच दिवाळीला चाळीतल्या सगळ्या मुलांना फुलबाजाची एक एक पेटी वाटून त्यांच्या आनंदात रमून जाणारा नारायण आणि रात्री दिव्यात घालायला रॉकेल नाही म्हणून शेजारच्या जाधवांकडे अर्धी-बाटली रॉकेल उसनं मागणारा नारायण...ही दोन चित्रं मी अगदी जवळून पाहिली आहेत. नारायणच्या नशिबी अशी लाचारी, हे अपमानास्पद जिणं यायलाच नको होतं...पण...पण ते आलं होतं...त्याचा काही गुन्हा नसताना...!

...आणि अशा परिस्थितीत त्याच्यावर काळानं झडप घातली तीसुद्धा त्याचा काही अपराध नसताना......!

नियतीच्या ह्या विचित्र खेळानं माझं मन सुन्न होऊन जातं. कसलाही अपराध नसताना नारायणला ही मृत्यूची शिक्षा का भोगावी लागली? त्याच्या कुटुंबियांना देशोधडीला लावून नियतीला कसलं सुख लाभलं? प्रश्नावर प्रश्न आदळत असतात पण त्याचं उत्तर मात्र मला सापडत नाही. मनाच्या कप्याकप्यातून नारायणाच्या आठवणी मात्र उफाळून वर येतात......

नारायणानं माझ्या मनात घर करावं असं त्याच्यात होतं तरी काय? नव्हतं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, ना धड शिक्षण झालेलं. कसलं पुढारीपण...अगदी गल्लीतल्या गणेशोत्सवातलं देखील नव्हतं. 'सर्व गुण आश्रयाला येतात' ते धनदेखील फारसं नव्हतं...आणि पुढं पुढं तर पैशाकरितां त्याला सगळी लाज बाजूला ठेवून दुसऱ्या-पुढे हात पसरण्याची पाळी आली होती. माझेच पन्नास रुपये त्याला शेवटपर्यंत देता आले नव्हते...आणि देणार तरी कुठून...? मुंबईसारख्या शहरात काही कामधंदा नसताना नारायण सहा महिने जिवंतच राहिला कसा? याचचं मला त्या वेळी आश्चर्य वाटत राहायचं. महिना नगद तीनशे रुपये खिशात घालूनसुद्धा एक आणि एकतीस यातलं अंतर भरून काढता काढता आमच्यासारख्या लोकांची तारांबळ उडत होती. अन्नूनं राहणं कठीण होऊन बसलं होतं...तिथं सहा महिन्याचा काळ...? बेकारीत...? माझी छाती दडपून गेली...

संध्याकाळचा तो एकदा असाच मी एकटा असलेला पाहून आला आणि

अवघडलेल्या चेहऱ्यानं म्हणाला,

"मला एक दहा रुपयांची मदत करा नाना...कामावर सुरू झालो की पहिल्या पगारालाच मी ते परत करीन."

अशा पैसे मागण्याच्या वेळी इतर लोक करतात तसली शाब्दिक साखरपेरणी नाही...की मला फुकटचा 'मोठेपणा' अगर 'दयाळूपणा' चिकटविण्याचा प्रयत्न नाही...सरळ मागणी आणि पैसे कधी परत करीन हे सांगण्यातला आत्मविश्वास ...मला त्यांच्या गिरणी बंद पडल्याच्या आणि हजारो कामगार बेकार झाल्याच्या हकीगती वृत्तपत्रांतून समजल्या होत्या...त्या कामगारांबद्दल मनातून हळहळ वाटत होती पण मी काय करू शकत होतो? निदान त्यातल्या एका कामगाराला तरी थोडीशी मदत करण्याची संधी मला मिळत होती. खिशातून दहा रुपयांची नोट काढून त्याच्या हातावर ठेवीत मी विचारलं,

"कधी सुरू होणार गिरणी? काही अंदाज लागतो का...?"

"काय सागावं...? कोर्टाच्या हातात अडकलेली कामं...? काय नेम सांगावा? एखादे वेळी सहा महिने लागतील नाहीतर उद्या–परवालादेखील सुरू होईल." नारायण शांतपणं म्हणाला.

"तेही खरंच." मी समजावणीनं म्हटलं, "मग कुठं दुसरीकडं कामधंदा का पाहत नाही तोपर्यंत. तेवढीच काहीतरी सवड होईल खर्चाची."

नारायण केविलवाणं हसला. त्या हसण्यात फार मोठा अर्थ होता. त्याला जणू म्हणायचं होतं. 'सहा–सात तास पंख्याखाली आरामात बसणारांना आमच्यासारख्या कामगारांची दुःख आणि अडचणी कळणार कशा?" पण त्यानं उघडपणे म्हटलं,

"आजकाल बेकारी किती वाढलीय हे तुम्ही पाहताच नाना–असं कोण सहजासहजी काम देतो? आणि दुसरं काही कामही पत्करता येत नाही कारण...?"

"काय?"

"रोज गिरणीवर जावं लागतं...तिथं सभा होतात. आमच्या युनियनचे पुढारी येतात – काही बातमी समजते शिवाय हजेरी लावून घ्यावी लागते"

"गिरणी तर बंद; मग हजेरी कसली?"

"इथंच तर सगळी मेख आहे. आमच्या गिरणीमालकाला कुठून तरी माणसं कमी करायची आहेत त्यासाठी हे डावपेच चालतात त्यांचे. त्यांचा खेळ होतोय् पण इकडे आम्हा कामगारांचा जीव जायची पाळी आलीय्...आम्ही कामगार लोक सर्वांची हजेरी लिहून ठेवतो – उद्या गिरणी सुरू झाली तर आपआपला हक्क सांगता यावा म्हणून...त्या साठी रोज जावं लागतं. रोजचे तीन चार तास फुकट जातात...पण करणार काय? गिरणी बंद...पगार नाही नि वर हा जाण्यायेण्याचा

पंधरा रुपये खर्च...शिवाय दुसरं कामही बघता येत नाही त्यामुळं." नारायणनं मला अज्ञात असलेली माहिती पुरविली. नि मी विचार करता करता मूढ बनलो. कित्येक गिरण्या आज धडाधड बंद होताहेत. हजारो कामगार नि त्यांची कुटुंबीय मंडळी बेकारीच्या खाईत कोसळून पडताहेत. आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना अशी पाळी आलीय् यांच्यावर! काय होणार लोकांचं? काय जेवत असतील? कुठ राहात असतील? कल्पनेच्या पलीकडचं जग नारायणनं माझ्यापुढं उभं केलं होतं.

आणखी आठ दिवसांनी पुन्हा नारायण आला. गिरणी सुरू होण्याची काहीच चिन्हं दिसत नाहीत असं म्हणाला नि पुन्हा त्यानं वीस रुपये मागितले – म्हणाला,

" बायको आणि मुलाला गावी पोचवून येतो...इथं त्याचे हाल पहावत नाहीत मला. माझं एकट्याचं कसं तरी निभावेल. हजेरी लावायची व्यवस्था केलोय् मी... थोडासा शेताचा तुकडा आहे गावाकडं. तिथं राबून काही मिळालं तर पाहतो. एकदा यांची गाडी मार्गाला लावतो आणि गिरणी उघडलीच तर येतो परत... तुमचे पैसे... "

" सावकाश दे...त्याची काही घाई नाही." मी त्याला पुरतं बोलू न देता म्हणालो. तो गावी जाणार...स्वतःच्या शेतात खपणार हे ऐकूनच मला आनंद झाला होता. वीस रुपये त्याच्या हातावर ठेवीत मी पुढं म्हणालो,

" जपून जा! थोडंसं काम मिळत असेल तर उगाच यायची घाई नको करू... गिरणी सुरू व्हायची असेल तर तुला कळेलच. तेव्हा ये." खोलीला कुलूप घालून नारायण गावी गेला. मी जरासा निश्चित झालो.

पण...

त्याला जाऊन आठदहा दिवसच झाले होते नि एका संध्याकाळी नारायणचा दरवाजा उघडा दिसला म्हणून आश्चर्यानं मी आत डोकावून पाहिलं. नारायण नुकताच येऊन कपडे बदलत होता. गिरणी सुरू व्हायची असेल म्हणूनच हा असा एकाएकी आला असणार हे नक्की असंच मला वाटलं आणि मी म्हटलं,

" चला, भोग संपलेला दिसतोय तुझा."

" का? "

" गिरणी सुरू... "

" नाही नाही. त्यासाठी नाही मी आलो नाना . . . तुम्हांला कदाचित आश्चर्य वाटेल. रागही येईल एखादवेळी . . . पण मला राहवेना ... रेडिओवरून बातमी आली नि मी धावत धावत दुपारची बोट पकडली."

नारायण एवढं सांगत होता तरीही माझ्या डोक्यात प्रकाश पडेना. आश्चर्य-मिश्रित कुतूहलानं मी विचारलं, " काय म्हणतोस तू?... कसली बातमी?"

" आपले तात्याराव सावरकर वारले ना आज...! त्यांचं एकदा दर्शन घ्यावं

अशी फार दिवसांची इच्छा होती; पण ते जिवंत असताना ती पुरी होऊ शकली नाहीं... आज निदान त्यांचं अंत्य दर्शन तरी..."

एका गिरणमजुराच्या मनात त्या देवतातुल्य स्वातंत्र्यवीराबद्दल अशा प्रकारच्या भावना असतील हे माझ्या ध्यानीमनीही नव्हतं... या शहरात राहून सावरकरांच्या मरणाची दखल मी फक्त वर्तमानपत्राचे स्तंभ वाचण्याइतपतच घेतली होती. पण हा मजूर ! ... सध्या एका वेळच्या जेवणाला महाग असलेला ... बेकारीच्या खाईत पडलेला ... आणि ही बातमी समजताच कुणाचे तरी पैसे उसने घेऊनच त्यांच्या अंत्यदर्शनासाठी मुंबईला धावतो... स्वतःची जन्मभराची निष्ठा जपण्यासाठी ... आणि... मी...?

अशिक्षित, गरीब नारायणाच्या तुलनेनं मी फार खुजा .... बुटका आहे हे मला जाणवतं.

दिवस असेच जात राहतात... नारायणाच्या गिरणीचा निकाल लांबणीवर पडत असतो... मध्यंतरीच्या काळात पाच – दहाकरून नारायणानं माझ्याकडून आणखी वीस रुपये नेलेले असतात. चार दिवस कुठं हमाली करून... एखाद्या कारखान्यात एक दोन दिवस रोजदारी मिळवून नारायण कसेतरी महिन्याकाठी पाचदहा रुपये कमावतो. आणि त्या दिवशी ऑफिसातून येऊन मी बिऱ्हाडात पाऊल टाकलं तोच माझ्या पत्नीनं घाबऱ्या घाबऱ्या ती अशुभ बातमी मला सांगितली,

"कळलं का तुम्हांला ?"

"काय... ?"

"आज दुपारी आपल्या शेजारचे ते नारायणराव आहेतना... त्यांना..."

"काय झालं... ?"

"रस्ता ओलांडत असताना लॉरीची धडक बसली... नि... खूप मार लागलाय... डोकं फुटलंय... बाई गऽऽ"

तिच्यानं पुढं बोलवेना एवढी ती घाबरली होती. अंमळशानं मी सर्व विचारपूस केली. हॉस्पिटलचं नाव विचारलं नि तडक तिकडेच गेलो. नारायण भेटेल की नाही या आशंकेनं भीतभीतच मी वॉर्डमध्ये प्रवेश केला नि त्याच्या कॉटजवळ येऊन थांबलो. सबंध डोक्याला बँडेज केलेलं... हात पाय बांधलेलं... बँडेजवरहीं रक्ताचे डाग... नारायणकड पाहवत नव्हतं... नर्स जवळ आली... म्हणाली,

"आताच शुद्धीवर येताहेत ते... त्यांचे कुणी जवळचे नातलग असतील तर ताबडतोब बोलावून घ्या त्यांना." नर्सच्या बोलण्यातील आणि चेहऱ्यावरील भावभावनांचा अर्थ मला उमगला की आता नारायण फार वेळचा सोबती नाही... नारायण जाणार... वाचण्याची आशा नाही या जाणीवेनं माझं अंतःकरण हेलावलं... काय कळविणार होतो मी बायको–मुलाला...? पुढच्या भीषण चित्राची रेखाकृती आताच डोळ्यापुढं उभी राहत होती ... तेवढ्यात नारायणानं डोळे

उघडले... आणि मला पाहताच जणू त्याच्या कवडचा होत चाललेल्या डोळ्यांत जीव उतरला... चेहऱ्यावर मंद हास्य तरळलं... ओठ काहीतरी पुटपुटत होते म्हणून त्याच्या तोंडाजवळ कान नेऊन मी ऐकू लागलो,

"ना... ना... तुम...चे पै...से राहिले .. आणखी... खूप... लोकांचे पण..." त्या स्थितीत... मरणाच्या उंबरठ्यावर उभा असतानादेखील नारायणाची पैसे परत करण्याची... आणि ते परत करता न आल्याबद्दलची हळहळ पाहून मी पुरता विरघळलो. त्याला बोलण्याचं थांबविण्याचा मी उगाचच वेडा प्रयत्न करू लागलो... तरी तो आपला अस्पष्ट पुटपुटतच होता...

"ना... ना... मी... मरणार... पण... लोक म्हणतील... मी... मी... आत्महत्या केली . . . लोकांचे पैसे द्यायला नकोत म्हणून मी आत्महत्या केली." नारायणाच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहत होते. आपल्या बँडेज केलेल्या हाताने माझा हात दाबल्यासारखं करून तो कळवळून बोलला, "मी... तसं... केलं... नाही... खरंच केलं नाही..."


पुढं त्याच्यानं बोलवेना... जीभ जड झाली असावी...

उजाडताच नारायणाचं प्राणोत्क्रमण झालं.

एक निष्ठावंत विकलांग जीवन ह्या जन्मीचं देणं फेडण्यासाठी पुनर्जन्म घेण्याकरिताच जणू पंचत्वात विलीन झालं.

नारायणाला जाऊन आता वर्ष होत आलं तरी देखील त्याची आठवण माझ्या मनाच्या पडद्यावरून पुसून जात नाही.

एका निरपराध जिवाचे 'मी आत्महत्या केली नाही' हे शब्द अजूनही कानावर आदळतात. नारायण त्या घडीला माझं काहीच देणं लागत नव्हता. त्यानं मरता मरता दाखविलेल्या अजोड निष्ठेनं त्याची कधीच फेड झाली होती. ○



"…शहाण्या माणसांना चौथी प्रसूती, आपत्कालातही मंजूर नसते…"—कुंतीचे उद्गार
( महाभारत, संभव पर्व )

तिसरा पांडव, अर्जुन याच्या जन्मानंतर जेव्हा पंडुराजाला आपणास अधिक संतती लाभावी अशी इच्छा झाली तेव्हा कुंती त्याला म्हणाली, "शहाण्या माणसांना चौथी प्रसूती मंजूर नसते." काळ बदलला आहे. सामाजिक रीतिरिवाज व मूल्येही बदलली आहेत. पण कुंतीसारख्या समजदार आर्य महिलेच्या विचारपूर्ण उद्गारांचे महत्त्व मात्र तसेच अबाधित राहिले आहे. उलट आजच्या नव्या परिस्थितीत तर त्यांचे महत्व विशेष वाढले आहे. आज कोणाही शहाण्या, संमजस माणसाला चार मुले नको वाटतात. कारण जेवढ्या अपत्यांचे व्यवस्थित पालन-पोषण आणि आदर्श संवर्धन आपण करू शकतो त्यापेक्षा जास्त मुले नसावीत हे त्याला पटते. मुले जितकी कमी तितके जास्त खाणेपिणे, कपडालत्ता, शिक्षण व इतर सर्व सुखसोयी प्रत्येक मुलाला लाभू शकतात. शिवाय अनेकवार गरोदरपण प्राप्त झाल्याने मातेचे आरोग्यही चांगले राहत नाही. अधिक संतती होणे आपण थांबवू शकता. तसेच पाळणाही लांबवू शकता. म्हणजे आपणास पाहिजेत तितकीच मुले, पाहिजेत तेव्हाच होऊ देणे हे आता तुमच्या



हातचे आहे. नजीकच्या कुटुंब नियोजन केंद्रात चौकशी करा. तेथे त्यासाठी मोफत सेवासोयी उपलब्ध आहेत.

**छोटे कुटुंब म्हणजे सुखी कुटुंब**

नातश्चतुर्थं प्रसवमापत्स्वपि … वदन्त्युत



मध्यपूर्वेच्या मरुभूमीवर सांडलेल्या रक्ताश्रूंची कहाणी




# युद्धाकडून युद्धाकडे..

-रा. म. शास्त्री.

## लेखांक दोन

पहिल्या महायुद्धानंतर तुर्कांचे साम्राज्य संपले. अल्जिरिया, सिरिया व लेबॅनॉन हे प्रदेश फ्रान्सच्या वर्चस्वाखाली आले. इराक व इजिप्तवर ब्रिटिशांची मुखत्यारी आली. फ्रेंचांनी सिरिया व लेबानन या प्रदेशात खूपच सुधारणा घडवून आणल्या. रस्ते बांधले, शिक्षणाचा प्रचार केला. दमास्कस शहर ही एक श्रीमंत नगरी झाली. १९२५ साली मुस्लीम अरबांनी फ्रेंचाविरुद्ध उठावणी केली, ती फ्रेंचांनी दडपून टाकली.

१९३६ साली मात्र फ्रान्सचा तेव्हाचा पंतप्रधान ब्लूम याने सिरिया व लेबानन स्वातंत्र्य कागदोपत्री मान्य केले. मात्र प्रत्यक्षात त्या दृष्टीने काही वाटचाल होण्यापूर्वीच दुसरे महायुद्ध भडकले. १९४० सालीच फ्रान्सने शरणागती दिली. महायुद्धात अखेर दोस्तांचा विजय झाला तरी सिरिया व लेबानन हे प्रदेश पुनः फ्रेंच वर्चस्वाखाली आता जाणे शक्यच नव्हते. राष्ट्रवादी, समाजवादी व कम्युनिस्ट यांच्या सत्तास्पर्धेत चांगले स्थिर सरकार कधीच लाभले नाही. लेबाननमध्ये प्रजासत्ताक सरकार अधिकारावर आले.

इराकच्या बाबतीत ब्रिटिश सरकारने फारच समजुतदारपणा दाखवला. १९३०

पहिल्या लेखांकात इस्रायलची कुळकथा सांगून झाली. या लेखात अरब जगताची थोडी ओळख.........

साली राजे फजल यांना गादीवर बसवून ब्रिटिशांनी आपली मुखत्यारी (Mandate) संपविली. फैजल याने लोकशाही राज्यपद्धतीचा दिखाऊ सांगाडा उभा केला, परंतु सर्व सत्ता मात्र स्वत:कडच राहील अशी व्यवस्था केली. देशात मारामाऱ्या खूपच होत्या. उत्तरेच्या कुर्द टोळ्या या स्वत:ला अरबांपासून वेगळ्या समजत. स्वतंत्र-स्वायत्त प्रांत त्यांना हवा होता. इराकी अरबांमध्ये शिया व सुन्नी यांचा झगडा होताच. असे असले तरी देश श्रीमंत होता. शेती उत्तम होती व तेलाचे उत्पन्न देशात पैसा खेचीत होते. सिरिया व लेबानन या देशातून नळ टाकून इराकचे तेल भूमध्य समुद्रांतील ट्रिपोली व हैफा या बंदरापर्यंत नेण्यात येत असे. यामुळे इराकला सिरिया, लेबनॉनची मर्जी संभाळून वागणेच भाग पडू लागले. तरी या तेलाच्या उत्पन्नातून इराकमध्ये मोठमोठ्या पाटबंधारे व वीजउत्पादनाच्या योजना हाती घेण्यात आल्या–

१९३६ साली जनरल सिडकी या सेनाधिकाऱ्याने यशस्वी कट व बंड करून सत्ता बळकावली. १९३७ मध्ये यांचा खून झाला. मग चार सेनाधिकारी १९४१ साली पुन: सत्तेवर आले व त्यांनी नाझीधार्जिणे धोरण पत्करले. इराकपर्यंत

जर्मनीला शिरकाव मिळू नये यासाठी इंग्लंडने, इराकमध्ये सैन्य पाठवून पुन: देशाचा कबजा केला. पुढे युद्ध संपल्यावर राजे दुसरे फैजल यांना गादीवर बसवून नूरी सैद याने राज्यसूत्रे हाती घेतली. १९५८ पर्यंत नूरी सैदचा राज्यकारभार चालला. १९५८ साली सैन्याने ब्रिगेडियर कासिम याच्या नेतृत्वाखाली कट रचून नूरीची सत्ता उलथवली. नूरी सैद याला बगदादच्या रस्त्यात जमावाने ठार केला. सर्व राजघराण्यातील लोकांना कंठस्नान घातले. ब्रिगेडियर कासिम इराकचा सर्वाधिकारी झाला, व त्याने इजिप्तबरोबर घनिष्टसंबंध प्रस्थापित केले.

ट्रॅन्सजॉर्डन व पॅलेस्टाईनची मुखत्यारी पहिल्या महायुद्धानंतर ब्रिटिशांकडे आली होती. जॉर्डन हे स्वतंत्र राष्ट्र ब्रिटिशांनी निर्माण केले व अबदुल्ला इबन हुसेन याला जॉर्डनचा अमीर म्हणून नियुक्त केले. १९४८ मध्ये पॅलेस्टाईनची मुखत्यारी संपुष्टात आल्यावर हाच हुसेन जॉर्डनचा राजा झाला. या जॉर्डनची लोकसंख्या अवघी ३००,००० होती; व यातले बहुतेक टोळीवाले होते. पॅलेस्टाईनची फाळणी होताच जॉर्डनने जो नवा भाग जॉर्डनला जोडला तोच सर्वात मोठ्या लोकसंख्येचा होता. या प्रदेशाची लोकसंख्या १,५००,००० असली तरी यातले ५००,००० अरब हे पॅलेस्टाईन सोडून पळालेले निर्वासित अरब होते. १९५१ मध्ये राजे अबदुल्ला हुसेन यांचा खून झाला. अबदुल्ला हुसेनचा मुलगा हा अर्धवट असल्याने, इंग्लंडमध्ये लष्करी विद्यालयात शिकत असलेला नातू हुसेन हा राजा झाला व १९५३ मध्ये जॉर्डनला येऊन त्याने राज्यसूत्रे हाती घेतली. जॉर्डनची आर्थिक स्थिती आता कठीण झालेली होती. इंग्लंडचा आधारही आता फारसा नव्हता. अमेरिकन मदतीवर जॉर्डन आता जगू लागले. असे असले तरी जॉर्डनची सेना जनरल जॉन ग्लब या इंग्लिश सेनाधिकाऱ्याने सुसज्ज ठेवली होती. ६०,००० संख्येचे हे सैन्य जॉर्डनचे संरक्षण करण्यास सदैव सिद्ध होते. सैन्य जॉर्डनचे परंतू ते एका इंग्लिश सेनानीच्या आधिपत्याखाली ही परिस्थिती राष्ट्रवादी अरबांना फार काळ सहन होण्यासारखी नव्हती. जनरल ग्लब याला हाकलण्याची मागणी लवकरच सुरू झाली.

## नासरचा उदय

अरब जगतातली महत्त्वाची सत्ता मात्र प्रथमपासून इजिप्त हीच आहे. इजिप्तचा सत्ताधारी खेदीव इस्माईल याच्याविरुद्ध बंडाळी झाली तेव्हा १८८२ मध्ये इंग्लंडचा पंतप्रधान ग्लॅडस्टन याने ब्रिटिश फौजा तिथे धाडल्या व खेदीवाची सत्ता स्थिर केली. ग्लॅडस्टनचा मनोदय तिथेच ब्रिटिश सेनेने राहावे असा नव्हता, परंतु खेदीव इस्माईलनेच ब्रिटिश सेनेला संरक्षणासाठी ठेवून घेतले. इजिप्तवर इंग्लंडची मुखत्यारी सुरू झाली. १८८३ ते १९०७ या कालखंडात इजिप्तचा राज्यकारभार लॉर्ड क्रोमर या इंग्रज गृहस्थानेच चालवला. देशातील लांचलुचपत याने बरीच नष्ट केली. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील करांचा बोजा हलका केला, पाटबंधारे

योजना हाती घेतल्या, रुग्णालये बांधली. परंतु हे करीत असताना त्याने राज्यकारभार मुख्यतः इंग्लीश अधिकाऱ्यांमार्फतच केला. देशात यामुळे वपद पक्ष हा राष्ट्रीय पक्ष बलवान होऊ लागला व अधूनमधून राष्ट्रवाद्यांशी इंग्लिशांचे वाजू लागले. पहिले महायुद्ध संपताच वपद पक्षाने संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली. १९२२ मध्ये अखेर ब्रिटिशांनी फक्त संरक्षण आपले हाती ठेवून इजिप्तला स्वातंत्र्य दिले. सर्व पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळून, राजे फौद यांना राज्यकारभार करण्यासाठी लोकशाही तंत्रातले मंत्रिमंडळ निवडून येण्यास सुरुवात झाली. १९३६ साली राजे फौद मरण पावले तेव्हा त्यांचा मुलगा फरुक हा अज्ञान होता. पंतप्रधान नाहसपाशा याने ब्रिटिशांशी करार केला, की इजिप्तमधून त्यांनी फौजा काढून घ्याव्या व त्या फक्त सुएझ कालव्याच्या परिसरात ठेवाव्या. त्याचप्रमाणे इजिप्तचे सैन्य उभारण्यास ब्रिटिशांनी मदत करावी. प्रत्यक्षात काहीही घडण्यपूर्वी दुसऱ्या महायुद्धाचे ढग युरोपात गडगडूं लागले. त्यातच मुसोलिनीन आबीसिनीयावर स्वारी केलेली असल्याने नाहसपाशाला ब्रिटिशांचे संरक्षण आवश्यकच वाटत होते. दुसरे महायुद्ध सुरू होताच, इजिप्तच्या भूमीवर युद्धच अवतरले.

महायुद्ध संपल्यावर इजिप्तवर आता गादीवर आलेल्या फरुकचा राज्यकारभार सुरू झाला. कैरो आता राजाच्या विलासाचे मोहागरच झाले. वस्तूंच्या किंमतीचा माणसाच्या आमदानीशी मेळ नव्हता. आत्यंतिक गरिबी जनतेच्या वाटयाला व सर्व श्रीमंती राजे फरुकच्या तैनातीला, अशी भयानक परिस्थिती निर्माण झाली. 'मुस्लीम ब्रदरहुड' नावाची संघटना ब्रिटिशद्वेष पसरवू लागली. नाहसपाशाने इंग्लंडशी केलेल्या १९३६ च्या कराराचा सर्वत्र धिःकार करण्यात येऊ लागला. हिटलर-मुसोलिनीच्या भयाने ब्रिटनच्या कच्छपी लागलेली अरब जनता, आता इंग्लिश माणसावरच उलटली. १९५२ च्या जानेवारीत कैरोमध्ये युरोपियन लोकांच्या हत्येची लाटच उसळली. दिवसा ढवळ्या खून पडू लागले. देशात गोंधळ सुरू होण्यापूर्वीची बजबजपुरी सर्वांना जाणवू लागली.

इजिप्तच्या सैन्यातील अधिकाऱ्यांना, वरिष्ठ ब्रिटिश अधिकारी हलके समजून वाईट वागणूक देत. त्यांचा अपमान करीत. सेनेतील या असंतोषाचा फायदा घेऊन ब्रिगेडियर महंमद नगीब, व कर्नल नासर या दोन लष्करी अधिकाऱ्यांनी कट रचला. १९५२ च्या जुलै महिन्यात या सूत्रधारांनी लष्करी क्रांती यशस्वी केली. राजा फरुक देशाबाहेर पळाला. प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. ब्रिगेडियर नगीब हा अध्यक्ष व पंतप्रधान झाला. नगीब हा या राज्यक्रांतीतील एक दर्शनी बाहुले होता. सगळी सत्ता कर्नल नासरच्याच हाती होती. दोन वर्षांनी योग्य वातावरण होताच १९५४ मध्ये नासरने नगीबला सत्तेवरून ढकलून सर्व अधिकार आपलेकडे घेतले.

१५ जानेवारी १९१८ या दिवशी, बेनीमोर या खेड्यात नासरचा जन्म झाला. त्याचा बाप पोस्टात नोकरी करणारा मध्यमवर्गीय नोकर होता. शालेय शिक्षण व इजिप्तच्या लष्करी विद्यालयात प्रवेश मिळाल्यावर तेथील शिक्षण पुरे करून तो वयाच्या १९ व्या वर्षीच १९३७ साली कमिशन घेऊन सैन्यात दाखल झाला. महत्त्वाकांक्षी, उत्साही आणि राजकीय आकांक्षा धरणाऱ्या या तरुण अधिकाऱ्याभोवती, त्याच्या समवयस्क लष्करी अधिकाऱ्यांचे एक वर्तुळ जमा झाले. १९४० ते ४५ या काळात या मंडळींनी नासरच्या नेतृत्वाखाली एक गुप्त संघटना निर्माण केली.

१९४८ च्या इस्रायल–अरब युद्धात पॅलेस्टाईनमध्ये नासर लढला. त्यात त्याच्या खांद्याला जबर जखम झाली. युद्धात इस्रायलने अरबांची जी नाचक्की केली ती या तरुण अधिकाऱ्यांच्या गुप्त संघटनेला अतिशय झोंबली. त्यांनी या पराभवाचे खापर राजे फरुक यांच्या नालायक, विलासी राज्यकारभारावर फोडले व त्यांना स्थानभ्रष्ट करण्यासाठी गुप्त कट रचला. कटाचा सूत्रधार म्हणून जनरल नगीब याला पुढे करण्यात आले. परंतु सूत्रे कर्नल नासरच्याच हाती राहिली होती. १९५४ मध्ये अलेक्झांड्रियात नासरच्या खुनाचा प्रयत्न होताच, नासरने जनरल नगीबला दूर सारले.

प्रखर राष्ट्रवादी व साम्राज्यवाद्यांचा विरोधक असा कर्नल नासर सत्तेवर येताच त्याच्याभोवती एक यशाचे तेजोवलय निर्माण झाले. इजिप्तमध्ये चौफेर सुधारणांची मोठी उत्साहाची लाट पसरली. रुग्णालये, शाळा यांची बांधणी सर्वत्र हाती घेण्यात आली. खेड्यापाड्यांतून पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था होऊ लागताच, रोगराई कमी होण्यास सुरुवात झाली.

साम्राज्यवादी इंग्लंडनेच झिओनिस्ट चळवळीला खतपाणी घालून अखेर बाल्फोर घोषणेनुसार अरबभूमीवर इस्रायलच्या निर्मितीचे सूतोवाच्य केले, ही गोष्ट नासरने ध्यानात ठेवून ज्यू–द्वेष व इंग्लंड–द्वेष याचे एक जालीम रसायन देशात तयार केले.

पाश्चिमात्य देशांशी आतापर्यंत इजिप्तचे असलेले आश्रिताचे नाते संपुष्टात आणून, इतर प्रगत देशांच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय राजकारणात उन्नत मानेने वागण्याइतकी मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून घेणे, हे नासरचे पहिले उद्दिष्ट होते. या दृष्टीने राजकीय क्षेत्रात असा एखादा दैदिप्यमान विजय मिळविल्याखेरीज आपली सत्ता जनमानसाची पकड घेणार नाही हा त्याचा हिशेबही अगदी बरोबर होता.

मध्यपूर्वेच्या राजकारणात इंग्लंडची राजकीय पत १९४८ मध्ये, पॅलेस्टाईनची मुखत्यारी सोडल्यापासून कशी घटत चालली होती हे नासर पाहत होता. या दृष्टीने इराणमध्ये घडणाऱ्या घटनांकडे त्याचे बारीक लक्ष होते.

इराणमध्ये डॉ. महंमद मुसादिक हा पंतप्रधान म्हणून १९५१ मध्य अधिकारावर आला होता. इराणमधील सर्व तेलकंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करावे ही त्याची

मागणी लोकप्रिय होत जाऊन अखेर इराणच्या शहाला मुसादिकच्या पक्षाला सत्ता देणे भाग पडले होते.

इराण हे काही अरब राष्ट्र नाही. तुर्कांच्या अंमलाखालीही ते कधी गेले नव्हते. फार पुरातन संस्कृती व परंपरा या देशाला आहे. तिथली वंशपरंपरेची राजसत्ताही इतिहासात सर्वांत जुन्या राजसत्तेपैकी एक आहे. १९०७ साली रशिया व इंग्लंड या दोन चोरांनी, इराणच्या कुठल्या प्रदेशांवर आपआपली सत्ताकक्षा रहावी याचे वाटप केले. दोघांनी इराणचे स्वातंत्र्य मात्र मान्य केले. उत्तर इराण ही रशियाची सत्ताकक्षा तर दक्षिण इराण ही इंग्लंडची सत्ताकक्षा असे ठरवण्यात आले. पहिल्या महायुद्धानंतर १९२५ मध्ये इराणचा शहा रेझा शहा पहेलवी याने तुर्कस्थानच्या केमालपाशाप्रमाणे प्रगतिशील राजवट निर्माण करण्यास सुरुवात केली. १९४१ साली म्हणजे दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात झाल्यानंतर रेझा शहाचा मुलगा महंमद रेझा पहेलवी हा गादीवर आला. त्याने आपली खाजगी अफाट मालमत्ता शेतकऱ्यांत वाटून टाकली. राजाचे हे समाजवादी कृत्य, इराणमधील धनिक दरबारीजनांना आवडले नाही. डॉ. महंमद मुसादिक याची घोषणा ही अधिक आकर्षक व निरुपद्रवी होती. दरबारी लक्ष्मीधरांनी, डॉ. मुसादिकची तळी उचलून धरली व तो पंतप्रधान झाला.

डॉ. मुसादिक हे एक अजब पात्र होते. पायजमा घालून तो अंथरुणावर लोळता लोळता राज्यकारभार करीत असे. मधून मधून तो जाहीर अश्रुपाताचे कार्यक्रम करीत असे. जाहीर अश्रू ढाळणारा हा पहिलाच पंतप्रधान असावा! सत्तेवर आल्याबरोबर त्याने अँग्लो–इराणी तेल कंपनीचे राष्ट्रीयीकरण केल्याचे जाहीर केले. आबादान येथील कंपनीचा अवतारच त्यामुळे संपला. इराणच्या खजिन्यात पैशाची आवकच संपली.

काहीसा मूर्ख व आक्रस्ताळी असलेला डॉ. मुसादिक आता, मजलीस म्हणजे इराणची लोकसभाच गुंडाळून ठेवणे इष्ट म्हणू लागला. शेवटी ऑगस्ट १९५३ मध्ये इराणच्या शहाने रागरंग पाहून मुसादिकला अधिकारावरून पदच्युत केले. अटकेत टाकून खटला भरला. तीन वर्षांनी शिक्षा कोर्टाने जाहीर करताच मुसादिकने जाहीर रुदनाचा आणखी एक अखेरचा कार्यक्रम केला. आणि मुसादिक कंपनीचा खेळ समाप्त झाला! आबादानच्या अँग्लो–इराणी तेल कंपनीला जीवदान मिळाले. परंतु झालेले राष्ट्रीयीकरण रद्द झाले नाही. इंग्लंडचे इराणमधील एकतर्फी वर्चस्व संपुष्टात आले व त्याची जागा अमेरिकेने सौहार्दाने घेतली. मुसादिकच्या राजवटीतच 'पॉइंट फोर' कार्यक्रमानुसार अमेरिकेचा पैसा इराणमध्ये ओतला जाऊ लागला होता.

इराण व पॅलेस्टाईनमधून इंग्रजाने गाशा गुंडाळला होता. भारतातील सत्तांतरानंतर इंग्लंडची सर्व राजकीय पत आता कमीतकमी पातळीवर घसरलेली आहे

हे ओळखून, अध्यक्ष नासर याने जुलै १९५४ मध्ये इजिप्तमधून सर्व इंग्लिश सैन्य काढून घेण्यासाठी ब्रिटिश सरकारशी पुन: बोलणी सुरू केली.

या वेळी सर विन्स्टन चर्चिल हे पुन: प्रंतप्रधान म्हणून अधिकारावर होते. त्यांच्या सरकारने नासरशी करार केला. त्याची मुख्य कलमे होती:–

१ : सुवेजच्या क्षेत्रांतूनही इंग्लिश फौजा काढून घेण्यात याव्यात.

२ : कालवा विभाग सोडण्यापूर्वी तेथील सर्व बांधकामे आहेत त्या स्थितीत इजिप्तच्या हवाली करण्यात यावीत.

३ : जर पुन: कधी युद्ध पेटले तर इंग्लंडला या विभागात पुन: सैन्य पाठविता यावे.

आपल्या निर्णयाचा पाठपुरावा करताना चर्चिल यांनी कॉमन्स सभागृहात सांगितले–

" बरेच दिवस माझे असे मत बनत चालले आहे, की इजिप्तमध्ये अमेरिकेलाही काही हितसंबंध आहेत. सुवेज कालव्यात तर आहेतच. असे असताना या दोन्ही गोष्टींची जबाबदारी यापुढे केवळ इंग्लंडवरच राहू नये. "

इंग्लंडचे हितसंबंध गुंतले असतानाही जर अमेरिका पाठपुरावा करीत नसेल, तर या भागातून माघार घेणेच भाग आहे ही गोष्ट खरी असली तरी अणुअस्त्रांच्या निर्मितीमुळे इजिप्त व सुवेज कालवा यांचे महत्त्व तितकेसे उरलेले नाही, असाही एक सूर चर्चिल यांनी काढला. अर्थात हा सूर खरा असेल तर हितसंबंध गुंतले आहेत हे कारणच लटके पडते.

वस्तुस्थिती अशी होती की मध्यपूर्वेकडील अरब राष्ट्रे व इस्रायल यांच्याविषयी अमेरिकेला कसलाही भावनात्मक ओलावा नव्हता. हा सर्व मध्यपूर्वेचा टापू, कम्युनिस्टांचे कुरण होऊ नये एवढीच राजकीय आकांक्षा अमेरिकेपाशी होती. या प्रदेशापासून कम्युनिस्टांना दूर कसे ठेवायचे ? तर बिगर कम्युनिस्ट राजवटींना उचलून धरून सर्वतोपरी आर्थिक व लष्करी मदत करून ! ! त्यांचा हेतू या मार्गाने कितपत साध्य झाला हा प्रश्न निराळा ! मध्यपूर्वेत जे तेलाचे साठे होते त्यावरही अमेरिकेचा डोळा नव्हता. थोडक्यात मध्यपूर्व प्रदेशाबाबत, जोपर्यंत तिथे कम्युनिस्ट राजवटीचा शिरकाव होत नाही, तोपर्यंत अमेरिकेची भूमिका संपूर्ण उदासिनतेची रहाणार होती. एकटया इंग्लंडला मध्यपूर्वेत शस्त्राच्या बळावर काहीही वजन निर्माण करणे शक्यच नव्हते तेव्हा सर्वतोपरी विचार करून चर्चिल सरकारने, सुवेझ परिसरातून ब्रिटिश फौजा काढून घ्या, ही नासरची मागणी मान्य करून टाकली.

नासरचा हा मोठाच विजय होता. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नासरमुळे इजिप्तची मान खरोखरच उंच झाली होती. यात नासरच्या कर्तृत्वापेक्षा परिस्थितीचे दडपण महत्त्वाचे होते ही गोष्ट नासरने ध्यानात घ्यावयास हवी होती. पुढील घटनांवरून

नासरशहा या पहिल्याच विजयाने अकारण उद्दाम झाला हे लक्षात येईल.इंग्लंडच्या निर्णयाचे स्वागत करताना नासरने जाहीर सभेत मोठे नाटयपूर्ण भाषण केले. त्यात त्याने सांगितले—

" या करारामुळे परस्पर विश्वास, आत्मविश्वास व सहकार्य यावर आधारलेल्या संबंधाचे एक नवे पर्व, इजिप्त व ब्रिटन या दोन्ही देशांनी सुरू केले आहे. आमच्या अंत:करणातील ब्रिटिश द्वेष आता आम्हाला मनातून काढून टाकून, ब्रिटनबरोबर परस्पर विश्वासाचे नवे नाते प्रस्थापित करावयाचे आहे. "

## पुढचे पाऊल

येथपर्यंत अरबजगताचे इजिप्तचे नेतृत्व अबाधित होते. १९४८ साली इस्रायलने केलेल्या पराभवाचा सूड उगवायचा तर आपल्या नेतृत्वाखाली सिरिया, जॉर्डन, लेबानन, इराक या सर्व अरब राष्ट्रांचे एक मोठे संयुक्त गण राज्य निर्माण केले पाहिजे व हे निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा आता नासरने धरली. इस्रायलच्या सरहद्दीचा भंग करून लूटमार व खून पाडणाऱ्या अरब टोळयांचा एकीकडे देशभक्त म्हणून गौरव करीत असतानाच, सर्व इतर अरब राष्ट्रांचो 'दावी' आपल्या हाती येतील या दिशेने नासरचे राजकारण सुरू झाले.

१९४९ च्या इस्रायल बरोबरच्या समझोत्याच्या कराराची शाई व ळने न वाळते तोच, जगाच्या नकाशावरून 'इस्रायल' पुसून टाकण्याच्या वल्गना अरब देशांच्या नेत्यांनी आता सुरू केल्या होत्या. नासरच्या नेतृत्वाखाली १९५४ च्या प्रारंभी, सुवेज कालवा विभागांतून ब्रिटनला सैन्य काढावयास लावण्यात आल्यानंतर, राष्ट्रीय चैतन्याची जी लाट अरब जगतात उसळली, त्याचे नवे लक्ष्य म्हणून इस्रायल खतम करण्याची इच्छा वारंवार व्यक्त करण्यात येऊ लागली. १९५४ च्या अखेरीस 'इस्रायल' विरुद्ध प्रत्यक्ष अत्याचारांना विलक्षण ऊत आला. इस्रायल सरहद्दीला लागून असलेल्या इजिप्तची गाझा पट्टी, लेबानन, जॉर्डन व सिरिया या देशांतून अरब टोळया इस्रायलची सरहद्द ओलांडून आत येऊ लागल्या. काही मैल आत घुसावे, इस्रायली पोलिस वा लष्करी अधिकाऱ्यांचे खून पाडावे व मिळेल ती चीजवस्तू घेऊन पुन: परतावे असे प्रकार सर्रास होऊ लागले.

केवळ अरब टोळयांना उत्तेजन देऊन इस्रायलला सतावावे एवढयापुरतीच नासरची झेप नव्हती. इस्रायलविरुद्ध होणाऱ्या भावी अटळ युद्धासाठी शस्त्रास्त्रांची आवक त्याने जोरात सुरू केली. सप्टेंबर १९५५ मध्ये नासरने झेकोस्लोव्हाकियाशी शस्त्रास्त्र मदतीचा करार केला. ५३० लष्करी यंत्रसज्ज गाडया, २३० टँक, २०० लष्कर वहातुकीच्या गाडया, २०० फायटर विमाने व अमाप दारूगोळा नासरने पैदा केला.

मध्यपूर्वेतील विरोधी देशातील शस्त्रास्त्रांचे प्रमाण या मदतीमुळे बदलले. इस्रायलकडे असलेल्या शस्त्रास्त्रांच्या चौपट शस्त्रास्त्रे इजिप्तमध्ये आता आयात केली

गेली होती. रशियन बनावटीची मिग व इल्युशिन विमाने व टी. ३४ रणगाडे, हे इस्रायलजवळ असलेल्या विमानांपेक्षा व शेरमन रणगाड्यांपेक्षा अधिक चांगले होते.

शस्त्रधारी देव लोकांना अधिक आवडतात. जमाल अब्दुल नासरची ही शस्त्रसज्ज प्रतिमा अरबांना आता अधिकच आवडू लागली. १९ ऑक्टोबर १९५५ या दिवशी इजिप्त व सिरिया यांच्या सेनाधिकारांचे एकत्रीकरण करण्यात आले. पुढे वर्षभरात जॉर्डन याच संयुक्त सेनादलाचा तिसरा भागीदार झाला. इजिप्त व सिरिया याचे लष्कर एका आधिपत्याखाली येताच, नासरच्याच इशाऱ्यावरून इस्रायल सरहद्दीवरचे आक्रमणाचे प्रकार वाढवण्यात आले. सामर्थ्य हे नुसते निष्क्रीय राहू शकत नाही. नव्याने मिळविलेल्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करून इस्रायलविरुद्ध सतत कुरापती काढत राहण्याचे धोरण आता नासरने सुरू केले. यासाठी जिवावर उदार असणाऱ्या निवडक अरबांच्या सशस्त्र टोळ्या तयार करण्यात आल्या. या अरबांना 'फेडायून' म्हणजे – प्राणत्यागाची तयारी असलेले– असे नाव दिले गेले होते. या सर्व (सुमारे १००० गाझा पट्टीत होते) फेडायून टोळीवाल्यांना इजिप्तच्या लष्करातून महिना पगार चालू करण्यात आला होता व विशेष कामगिरीबद्दल अधिक रकमांची खैरात होऊ लागली. इजिप्तच्या लष्करी गुप्तचर भागाचा प्रमुख कर्नल मुस्ताफा हाफीज हा गाझा पट्टीच्या गव्हर्नरला पाठवलेल्या एका पत्रात लिहितो ––

"युनीस मुबारक हा आमचा प्रतिनिधी आहे. धाडसी व महत्त्वाची कामे तो पार पाडील. इजिप्तकरता व सेनेकरता त्याने आतापर्यंत खूपच शौर्य गाजवलेले आहे. पॅलेस्टाईनच्या अरबांच्या फेडायून पथकातला हा एक आहे. त्याने आतापर्यंत खालील महत्त्वाच्या कामगिऱ्या केलेल्या आहेत ––

१ : बतेहानून या ठिकाणच्या संत्र्याच्या मळ्यात घुसून त्याने तीन कामगार ठार केले.

२ : अल कबिबा इथल्या इलेक्ट्रिक पॉवर स्टेशनमध्ये जाऊन त्याने एक मेकॅनिक खलास केला.

३ : 'व्हाईस ऑफ इस्रायल' या रेडिओ केंद्राचे ध्वनिक्षेपक स्तंभ याने नादुरुस्त केले.

४ : झारनोगाजवळच्या एका शेतात घुसून याने एक शेतकरी ठार केला, चार जखमी केले व सरकारी इमारतीची नासधूस केली.

सदर युनीस मुबारक हा २६।५५ या खटल्यात खुनी म्हणून गोवला गेल्याचे कळते. त्याची वरील कर्तबगारी लक्षात घेऊन त्याची या खटल्यातून दयाळू होऊन मोकळीक करावी. यापुढे तो आपल्या अधिक उपयोगी पडण्याची शक्यता आहे.

– मुस्ताफा हाफीज,
कमांडर

अशा तऱ्हेने खुनी, दरोडेखोर म्हणून शिक्षा झालेल्या — अरबांतून ही ' छळवादी पथके ' उभी करण्यात येत होती.

सरहद्दीवर अरब लांडगे छापे घालीत असताना हे अत्याचार पहात स्वस्थ रहायला — इस्रायलला काही ' सेक्युलॅरिझम 'चा शाप नव्हता ! ज्यू राष्ट्र म्हणून ते यापुढे नांदू इच्छित होते आणि झालेल्या करारनाम्याचे पालन न करता अरबांचा नवा शहेनशहा नासर या राष्ट्रावर गंडांतर आणण्याची उघड तयारी करीत होता. इस्रायली जहाजांना उत्तरेच्या त्यांच्या भूमध्यसमुद्रातील हैफा बंदरातून तांबड्या समुद्रात यावयाचे तरी सुवेज कालव्यातून जावे लागे व दक्षिणेकडील ऐलान बंदरातून सुटलेल्या जहाजांनाही तिरानच्या आखातातून तांबड्या समुद्रात येता येत असे. सुवेज कालवा व तिरानचे आखात ही दोन्ही इस्रायली जहाजांना नासरने बंद करून टाकली.

या नाकेबंदीने इस्रायल गुदमरू लागले व ' इस्रायल 'ची हालचालही आता जोरात सुरू झाली. जनरल मोशे दायान हा इस्रायल सेनेचा वरिष्ठ सेनानी या वेळी फ्रान्समध्ये रजेवर होता. २२ ऑक्टोबर १९५५ या दिवशी इस्रायलचा संरक्षण मंत्री बेन गुरियान याची तार त्याला मिळाली.

" ताबडतोब येऊन भेटा ! "

दुसऱ्याच दिवशी जेरुसलेममधील ' प्रेसिडेंट हॉटेल ' या इमारतीत दायान, बेन गुरियानपुढे हजर झाला. परिस्थितीचा आढावा घेऊन गुरियानने आज्ञा दिली——

" तिरानचे आखात, शार्म ए शेख, रासनस्त्रानी, यांचा कबजा करण्याची तयारी करा. अकाबाचे आखात व तांबडा समुद्र यातील वाहतूक त्याशिवाय मोकळी राहणार नाही. "

दहा दिवसांतच इस्रायल सरकारांत खांदे पालट झाला. बेन गुरियान प्रधान मंत्री झाला. २ नोव्हेंबर १९५५ या दिवशी मंत्रिमंडळापुढे आपले धोरण विशद करतांना गुरियानने सांगितले——

" १९५५ च्या सुरुवातीपासून आतापर्यंत १५३ इस्रायली नागरिक अरब टोळीवाल्यांकडून फक्त गाझा पट्टीच्या भागात मारले गेले अथवा जखमी झाले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघात इजिप्तच्या प्रतिनिधीने जाहीर सांगून टाकले आहे की इजिप्त व इस्रायल यांच्यामध्ये आज युद्धमान स्थितीच आहे. सुवेझ कालव्यातून जहाजे जाण्यासंबंधी जो आंतरराष्ट्रीय करार आहे, तो इजिप्तने धाब्यावर बसवला आहे. आता तिरानचे आखातही बंद करून आमची कोंडी करण्यात आली आहे. हे एकतर्फी युद्ध थांबले पाहिजे कारण ते फार काळ एकतर्फी राहूच शकत नाही ! "

टोळीवाल्यांच्या अत्याचारी घूसखोरीविरुद्ध इस्रायली सेनेने आता जालीम उपाय सुरू केले. ज्या भागात टोळीवाले सरहद्दभंग करून इस्रायलच्या प्रदेशात अत्याचार करून परत गेले असतील, त्या भागातील इजिप्तच्या लष्करी ठाण्यांवर इस्रायली

सेनेने छापे घालून ते उद्ध्वस्त करण्यास सुरुवात केली. टोळीवाल्यांना पोसगारी हीच प्रमुख ठिकाणे होती. इजिप्तच्या लष्करी ठाण्यांना शह बसू लागताच, इजिप्तच्या सेनाधिकाऱ्यांत चलबिचल सुरू झाली. हा खेळ आता इजिप्तच्या सेनेच्याच अंगाशी येऊ लागला. युद्ध जाहीर न करताच लढाया पेटू लागल्या व प्रत्येक चकमकीत इजिप्तचा लष्करी आत्मविश्वास ढासळू लागला. आपल्या गावातून टोळीवाले इस्रायल सरहद्दीत घुसले, तर गावावर इस्रायली सेनेचा छापा पडतो, कापाकाप होते याचा अनुभव अरब जनतेला येऊ लागताच गावोगाव प्रक्षोभ माजला.

टोळीवाल्या घुसखोरांचा खेळ अंगाशी आला असताना, इजिप्तच्या सेनाधिकाऱ्यांनी या टोळीवाल्यांना आवरले असते तरी अजून भागण्यासारखे होते. परंतु इस्रायलच्या सैनिकांच्या पोलिसी कारवाईविरुद्ध, नासरने संयुक्त राष्ट्रांकडे तक्रारी गुदरण्यास सुरुवात केली. प्रकरण आता चिघळू लागले. अजून युद्धाला तोंड लागले नव्हते. परंतु ही काही शांततेचीही लक्षणे नव्हती.

## अघोषित युद्ध

बेन गुरियानने नासरशहाला स्पष्ट इशारा दिला. " आम्हांला शांतता मंजूर आहे आत्महत्या नाही ! "

सुवेज कालवा इस्रायली जहाजांना बंद नासरने केला, ही गोष्ट इस्रायलला मारक असल्याने इस्रायलभर एक संतापाची लाट उसळली होती. तरीसुद्धा या बाबतीत इस्रायलला फारसे काही करता येण्यासारखे नव्हते. सुवेजबाबतचे सर्व आंतरराष्ट्रीय करारमदार हे इंग्लंड व फ्रान्स यांनी निर्माण केलेले होते. तेव्हा इस्रायल अस्तित्वातच नव्हते ! परंतु तिरानच्या समुद्रधुनीची गोष्ट निराळी होती. अकाबाच्या आखाताच्या कक्षा या चार देशांच्या आहेत. इजिप्त, इस्रायल, जॉर्डन व सौदी अरेबिया या सगळ्या देशांची एक सरहद्द या आखाताला भिडलेली आहे. या आखातातून कुणा एका देशाच्या जहाजांना मज्जाव करण्याचा हक्क कुणालाही पोचत नाही. कुणाही एका देशाला या आखाताचा संपूर्ण किनारी जलाशय हा आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आपल्या मालकीचा ठरवता येणार नाही.

अकाबाच्या आखातात शिरणाऱ्या सर्व जहाजांची तपासणी इजिप्तने १९५३ सालीच सुरू केली व इस्रायली जहाजांवर निरनिराळे निर्बंध घातले होते. आता १९५५ साली इजिप्तने आपले स्रायलशी अघोषित युद्ध सुरू आहे हे कारण देऊन अकाबाच्या आखातातील तांबड्या समुद्राकडचा मार्ग इस्रायली जहाजांना बंदच करून टाकला. रास नस्रानी या ठिकाणी एक लष्करी ठाणे यासाठी नासरने बसवले.

इस्रायलपुढे आता प्रश्न इतकाच होता की गुदमरून मरायचे की लढून मरायचे! बेन गुरियनच्या इशाऱ्यामागची वेदना ही होती.

एकीकडे जनरल दायानला जिप्तचे नाक कापण्याची तयारी सुरू करण्याचा इशारा देऊन, बेन गुरियान याने डिसेंबर १९५५ मध्ये युद्धबंदी रेषेची देखभाल



करणाऱ्या, संयुक्त राष्ट्रांचा प्रतिनिधी जनरल बर्नस् याला सांगितले—

"इस्रायलच्या सरहद्दीत घुसून धुमाकूळ घालणाऱ्या अरब घूसखोरांना इजिप्तचे सक्रीय साहाय्य आहे याचा पुरावा आमचेपाशी आहे. नासरकडून १९४९ च्या समझोत्याच्या अटी कटाक्षाने पाळू अशी हमी मिळवा. आम्ही तशी हमी दिली आहे."

जनरल बर्न्स व संयुक्त राष्ट्राचे चिटणीस डॅग हॅमरशील्ड या दोघांनाही नासरकडून अशी हमी मिळवण्यात यश आले नाही. अरब घूसखोरांचे सरहद्दीवरील हल्ले व इस्रायली सेनेचे प्रतिहल्ले दिवसेंदिवस वाढत्या श्रेणीनेच आता होऊ लागले. १९५६ साल उजाडले तेव्हा इजिप्त–इस्रायल संघर्ष हा अघोषित युद्धाच्या अवस्थेत पोचलेला होता.

याच वेळी नासरने आस्वान धरणाच्या निमित्ताने इंग्लंड, अमेरिकेविरुद्ध प्रचाराची जोरदार आघाडी उघडलेली होती. आस्वान नदीवरील धरण हे लॉर्ड क्रोमर या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या अमदानीतच बांधले गेले होते. या धरणाची उंची वाढवून, पाण्याचा साठा वाढवण्याचे नासरने ठरवले होते. यासाठी १३ शे मिलियन डॉलर खर्च येणार होता. यापैकी ५६ मिलियन डॉलर अमेरिकेकडून व १४ मिलियन डॉलर इंग्लंडकडून मिळतील अशी आश्वासने अमेरिका व इंग्लंड यांनी दिलेली होती. जागतिक बँकेकडून नासरने २०० मिलियन डॉलरचे कर्ज मागितले होते. जागतिक बँकेने हे कर्ज नाकारले. इंग्लंड-अमेरिकेची मदत तर फारच अपुरी होती.

या घटनांचा फायदा घेऊन १२०० मिलियन डॉलरचे प्रचंड कर्ज रशियाने देऊ केले ! रशियाची ी नागमोडी चाल पाहून अमेरिकेचा परराष्ट्र सचीव फॉस्टर डलेस

हा खवळला व त्याने अमेरिकेने आश्वासन दिलेली मदत काढून घेतल्याचे जाहीर केले. ही मदत होती, कर्ज नव्हते..याचे कारण डलेसने असे दिले की इजिप्त झेकोस्लोव्हाकियाकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्र खरेदी करून युद्धाची तयारी करीत आहे.

गमाल अब्दुल नासरची परिस्थिती आता चमत्कारिक झाली. अमेरिकेने मदत रद्द करताच तो पिसाळलाच. त्याने अॅलेक्झांड्रियात २६ जुलै १९५६ ला एक जाहीर प्रचंड सभा घेतली. या सभेत २॥ तास नासर इंग्लंड–अमेरिकेवर तुटून पडला. भाषणाच्या अखेरीस त्याने सुवेझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केल्याचे जाहीर करून खळबळ उडवून दिली. ३५ मिलियन पौंड हे कालव्याचे वार्षिक उत्पन्न यापुढे आस्वान धरणाला वापरील असे त्याने सांगताच, सभेने प्रदीर्घ टाळ्यांचा कडकडाट केला.

डलेसला म्हणून, नासरने हाणलेली लाथ, बसली इंग्लंडच्या पेकाटात ! सुवेझ कालवा 'कंपनी' १९६८ सालापर्यंत राहणार होती. म्हणजे कायद्यानुसार अजून १२ वर्षे या कंपनीच्या ताब्यात कालवा रहावयास हवा होता. १८८८ साली झालेल्या आंतरराष्ट्रीय समझोत्यानुसार ही मुदत १२ वर्षांनी संपून, या कालव्यावर इजिप्तची सत्ता सुरू होणार होती. या कंपनीतले जवळजवळ अर्धे रोखे हे इंग्लंडचे होते. इंग्लंडमध्ये प्रतिवर्षी जवळजवळ २७–२८ मिलियन टन तेल आयात होत होते. त्यातले २२ ते २४ मिलियन टन सुवेझ कालव्यामार्गे येत असे. सुवेझवरची नासरची ही बेकायदेशीर झडप पडताच इंग्लंडमध्ये खळबळ माजली.

इंग्लंडचा पंतप्रधान अँथनी इडन याने सुवेझ कालव्यावर आंतरराष्ट्रीय नियंत्रणच हवे अशी जोराची मागणी करून, तिचा पाठपुरावा करण्यासाठी २२ राष्ट्रांची परिषद ऑगस्ट १९५६ मध्ये लंडनला बोलावली. इंग्लिश व फ्रेंचांना नासरचे हे कृत्य हिटलरची आठवण करून देणारे वाटत होते. इंग्लंडमधील विरोधी पक्ष नेते मजूर पुढारी गेटस्केल यांनी कॉमन्स सभागृहात अँथनी ईडन यांना पाठिंबा देताना सांगितले–

"आपली मध्यपूर्वेत पत वाढावी यासाठी कर्नल नासरने ही झडपेसरशी आक्रमक कृती केलेली आहे. पाश्चिमात्यांना आव्हान देऊन जय मिळविण्याची त्याची अपेक्षा आहे. हे सर्व आम्हाला सुपरिचित आहे. युद्धपूर्व काळात हिटलर-मुसोलिनीची पावले अशीच पडत होती."

लंडनमध्ये इडनने बोलावलेल्या परिषदेवर इजिप्तने बहिष्कार घातला. रशियाचा व भारताचा नासरला पाठिंबा जाहीर झाला. या गोष्टी इंग्लंडला अपेक्षित होत्या. परंतु अँग्लो–फ्रेंचांना धक्का बसला तो अमेरिकेची वर्तणूक पाहून ! निकिता क्रुश्चेव्हने रशियातील इंग्लिश वकिलाला तंबी दिली की नासरवर लष्करी दडपण आणलेत तर रशिया मध्यपूर्वेत हस्तक्षेप करील. ही गोष्टही अपेक्षित होती.

परंतु आस्वान प्रकरणात इजिप्तचा रोष ओढवून घेतलेल्या डल्लेसने आता इजिप्तने इंग्लंडची कास सोडून आपल्या कच्छपी लागावे यासाठी अँथनी ईडनला पाठिंबा देण्याचे नाकारले. त्याने जाहीर केले—" The Suez canal is not of

primary concern to the United States." म्हणजे आस्वान धरणाला अमेरिकेने मदत नाकारल्यामुळे ही सगळी मानगड निर्माण झाली, तीच अमेरिका इंग्लंडचे मध्यपूर्वेतील वर्चस्व उठवण्यासाठी व यामुळे निर्माण झालेल्या पोकळीत रशियाचा शिरकाव होऊ नये यासाठी, आता सांगत होती—"छे: छे: सुवेझ कालव्याचा प्रश्न अमेरिकेला प्राथमिक महत्त्वाचा मुळी वाटतच नाही!"

इंग्लंड–फ्रेंचांनी जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघात इजिप्तविरुद्ध तक्रार गुदरली तेव्हा डल्लेसने पुन: सांगितले—"आमचा इंग्लंड-फ्रान्सला या बाबतीत पाठिंबा नाही!"

गमाल नासरला अमेरिकेचा हा नैतिक पाठिंबा व रशिया आणि भारताचा संपूर्ण पाठिंबा मिळताच त्याचे पारडे विलक्षण जड झाले.

याच वेळी इस्रायल–इजिप्त संबंध अगदी विकोपाला गेलेले होते हे सांगितलेच आहे. डॅग हॅमरशील्डच्या प्रयत्नांना मध्यंतरी तात्पुरते यश येऊन बेन गुरियान व इजिप्त सरकार यांनी १८ एप्रिलला परस्परांविरुद्ध सर्व कारवाया बंद करण्याचे कबूल केले होते. हॅमरशील्ड यानंतर दहा-बारा दिवस मध्यपूर्वेतच मुक्काम करून होते. २९ एप्रिलला त्यांची पाठही फिरली नसताना, 'नाहल ओझा' या इस्रायली खेड्यांचा पुढारी रुदनेबर्ग याचा इजिप्तच्या सरहद्दीवरील अरबी टेहळ्यांनी इस्रायली सरहद्दीत गाझा पट्टीत घुसून खून पाडला. 'निर थिल्याक' या खेड्यात, इजिप्तने नव्याने पेरलेल्या एका सुरुंगाने इस्रायलची एक लष्करी मोटारगाडी उद्ध्वस्त झाली.

काही दिवसांतच घूसखोरांचे पूर्ववत् हल्ले, गाझा पट्टी व जॉर्डन या दोन्ही दिशांनी सुरू झाले. हँडग्रेनेडस्‌चा मारा इस्रायली खेड्यांवर सुरू झाला. इजिप्तच्या संमतीनेच घूसखोरांनी इजिप्तच्या लष्कराच्या पाठिंब्याने हे प्रकार सुरू केले होते. संयुक्त राष्ट्रांच्या चिटणीसाचा शब्द देऊन अजून महिनाही उलटला नाही, तोच इजिप्तच्या गाझा पट्टीतून हे प्रकार सुरू झाले, तरी नासरने चकार शब्द काढला नाही. कैरो रेडियोवरून घूसखोरांच्या अत्याचाराचे कौतुकच सुरू झाले. याचे कारण, याच सुमारास सुवेझ प्रकरणात नवा राजनैतिक विजय संपादन केल्यामुळे यशाचा माज आता नासरला चढला होता.

बेन गुरियाननेही आता हॅमरशील्डच्या मध्यस्थीचा नाद सोडला. त्याला इस्रायलने, पुन: निमंत्रण केले नाही. आणि तो देखील पुन: तिकडे फिरकला नाही! सुवेझ प्रकरणात इंग्लंड-फ्रान्सवर तात्पुरती का होईना मात केलेला नासर, आता इस्रायल नाशाच्या अंतिम हेतूच्या दिशेनेच वाटचाल करीत राहणार हे बेन गुरियानने ओळखले होते. आंतरराष्ट्रीय शास्त्रांची भाषा नासरला समजत नव्हती. शस्त्राघाताशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

इस्रायल सरकारने राखीव सैन्यदलात असलेल्या व नागरीजीवन जगणाऱ्या सर्व देशबांधवांना ताबडतोब सैन्यात दाखल होण्यासंबंधी हुकूम सोडले.

१४ दिवसांनी म्हणजे २९ ऑक्टोबरला सिनायवर इस्रायलची चढाई सुरू झाली!

□ क्रमश:

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## दि. २४ ते ३० ऑगस्टचे भविष्य

**मेष :** चौथ्या मंगळाची डोकेदुखी संपल्यासारखीच आहे. अनेक ग्रह आपल्या पंचमस्थानी आलेले आहेत–येत आहेत. आता नैराश्य, अपयश, अपेक्षाभंग हे सारे प्रकार एकदम नाहीसे होऊन प्रसन्न व उत्साही वातावरण सर्वत्र दिसू लागेल. आजवरची सारी गतिशून्य कामे वेग घेऊ लागतील. न होणारी कामे झटपट यशस्वी होऊ लागतील.

नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटावा. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात याव्यात, स्थावराची, राहत्या जागेची विवंचना मिटावी.

९ सप्टेंबरच्या सूर्य-गुरू युतीपासूनच अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडू लागेल. २२ सप्टेंबरच्या सूर्यग्रहणाच्या आसपास कोणत्याही महत्त्वाच्या कामाला हात घालू नका.

दि. १ ते ७, ९ ते १३, २५ ते ३० अपेक्षासाफल्याचा काल.

**वृषभ :** आजवर पराक्रमस्थ मंगळाने आपणांस चांगलाच हात दिला. आता ११ सप्टेंबरला तो चतुर्थस्थानी प्रवेश करताक्षणीच त्याच्या मनोवृत्तीत बदल झाल्यासारखे जाणवू लागेल. मनुष्य कितीही प्रयत्नवादी असला तरी चौथ्या मंगळात त्याचे सारे प्रयत्न निष्प्रभ ठरतात. सहानुभूतीचे वातावरण कुठेच दिसेनासे होईल. सप्टेंबरच्या पहिल्या १५।२० दिवसांत सांपत्तिक ताण इतका जाणवेल की, काही सुचेनासे होईल.

२२ सप्टेंबरचे सूर्यग्रहणही आपल्या कामात विघ्ने निर्माण करणारे जाणवेल. २५ सप्टेंबरपासून काहीसा यशस्वी व उत्साही काल जाणवायला लागेल. काहीशी जपूनच पावले टाकायला हवीत.

दि. ७ ते १०, १८ ते २०, २४ ते २८ या कालात आपले प्रयत्न थोडेफार यशस्वी व्हावेत.

**मिथुन :** मंगळ पराक्रमस्थानी येत आहे–आल्यासारखाच आहे. तो आपल्या साऱ्या व्यथाविवंचना दूर करील. सूर्य–गुरूचेही आपणांस हार्दिक सहकार्य लाभेल.

सप्टेंबर महिना आपल्या जीवनात अनेक चिरस्मरणीय प्रगतीच्या गोष्टी घडवून आणील. स्थानांतर, बदल असेही या महिन्यात घडावे.

सांसारिक संघर्ष संपुष्टात येतील. नोकरीधंद्यातील नव्या तंत्राचा प्रयोग यशस्वी ठरल्याचा प्रत्यय येऊ लागेल. साहित्य, कला, क्रीडा या क्षेत्रात तर अनन्यसाधारण यश संपादू शकाल.

अनेकांच्या मदतीने नव्या क्षेत्रात पदार्पण घडेल, राजकीय जबाबदाऱ्या उचलाल आणि त्या यशस्वी करून दाखवाल.

दि. ७ ते ११, १६ ते २०, २५ ते २९ हे दिवस नोंद करण्यासारखे आहेत.

**कर्क :** आजवर मंगळाचा धिंगाणा तुमच्या राशीत सुरू होता. आता तो तुमच्या राशीतून पसार होत आहे. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. तुमचे सारे प्रयत्न आता यशस्वी ठरू लागतील. नव्या आशा अंकुरायला लागतील, नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे पुढे पाऊल पडेल.

दुसरा पंधरवडा नोंद करून ठेवण्यासारखा सर्वंकष प्रगतीचा जाणवू लागेल. वैद्यकीय व्यवसायात, स्थापत्य-शिल्पकला क्षेत्रात अनन्यसाधारण यश संपादू शकाल.

या महिन्यातील ( २२ सप्टें. ) सूर्यग्रहणही तुमच्या प्रगतीच्या आड येऊ शकणार नाही.

दि. ८ ते १२, १८ ते २२, २६ ते ३० या काळी कोणत्याही कामात घवघवीत यश लाभेल.

**सिंह :** बाराव्या मंगळाची अनिष्ट कारकीर्द संपुष्टात आल्यासारखीच आहे. २१ सप्टेंबरात त्याचे राश्यंतर घडताच तुमचा निराशावाद गाडला जाईल आणि उत्साहाला उधाण यायला लागेल. शिवाय सूर्य-गुरू हे विशालग्रहही तुमच्या पाठीशी उभे आहेतच.

सप्टेंबर आरंभापासूनच नव्या ध्येय धोरणाचा पाठपुरावा केला जाईल, नव्या कार्यक्रमांत हिरीरीने भाग घेतला जाईल, उद्योगधंद्याचे नवे प्रभावी तंत्र आत्मसात केले जाईल.

९ सप्टेंबरच्या सूर्य-गुरू युतीपासूनच आपले सारे हेतू सफल होऊ लागतील-१३ सप्टेंबरचा शनि-मंगळ त्रिकोण तर कोणाही विरोधकाला आव्हान द्यायला उद्युक्त करील.

दि. ३ ते ६, ९ ते १३, २४ ते २८ या काळावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कन्या :** मंगळासह अनेक ग्रह व्ययस्थानी जमू लागलेले पाहून तुमचा गोंधळ उडणे साहजिक आहे. अवाढव्य खर्च समोर उभा राहील, अनेक पेचप्रसंग निर्माण व्हायला लागतील. या संकटातून आपण यशस्वीपणे पार पडाल याची मला खात्री आहे पण धावपळ धडपड खूपच करावी लागेल, अनेकांच्या सहकार्याची अपेक्षा करावी लागेल.

या महिन्यातील सूर्यग्रहणही ( २२ सप्टें. ) आपल्या राशीमध्येच घडून येणार असल्यामुळे, प्रकृतीवर मधून मधून आघात घडून यायला लागतील.

तात्पर्य, आरोग्य, प्रतिष्ठा स्वास्थ्य या सर्वच बाबतीत आपणांस ताण सहन करावा लागेलसे दिसते.

दि. ९ ते १३, १६ ते १९, २६ ते ३० थोडेफार यशस्वी दिवस एवढेच.

तूळ : आपल्या एकादशस्थानी इतके बहुसंख्य ग्रह एकदम एकत्र जमण्याचा काल मला वाटते तुमच्या हयातीत प्रथमच येत असावा. ११ सप्टेंबरला मंगळही तेथेच येत आहे, या ग्रहस्थितीकडे पाहिल्यानंतर असे म्हणावेसे वाटते की, तुमचा अपेक्षा-साफल्याचा काल हाच.

९ सप्टेंबरचा सूर्य-गुरू योग तर तुमच्यापुढे प्रगतीच्या अनेक संधी उभ्या करील. कलाक्षेत्रात दीर्घ मुदतीचे कररमदार होतील. हाती पैसा अनेक मार्गांनी यायला लागेल, आजवर कधीही न सुटलेले प्रगतीचे गणित आता झटपट सुटेल. या काळी आपण कुठेही गेलात काहीही केलेत तरी तुमचा तिथे सत्कारच घडेल.

ग्रहणाच्या आसपासचा काल थोडासा जपून काढण्यासारखा आहे.

२ ते ९, १६ ते २४, २७ ते ३० अनेक कामांत अमाप यश लाभावे.

वृश्चिक : आज तरी निदान सर्वत्र आघाडीवर पाहावयास मिळतील वृश्चिक राशी व्यक्तीच. आपल्या भाग्य दशमांतून अनेक समर्थग्रहांचे संचलन सुरू आहे याची ही किमया.

या सप्टेंबर महिन्यातील सूर्य–गुरू युतीमुळे तर ( ९ सप्टें. ) तुमचे कर्तृत्व चौफेर उधळू लागेल.

अनेक व्यवसायधंद्यांशी आपला घनिष्ठ संबंध यायला लागेल. परराष्ट्रीय व्यापारधंद्यांत प्रचंड उलाढाली घडून यायला लागतील. व्यापारी अंदाज खरे ठरतील, पुढे टाकलेले पाऊल पावित्र्यात पडेल. नोकरीत तर आजवर कधीही न लाभलेले प्रतिष्ठेचे स्थान सहजासहजी मिळून जाईल.

दि. ७ ते १३, १६ ते २१, २७ ते ३० अपेक्षासाफल्याचा काल हाच.

धनु : कित्येक महिन्यांपासून आपण मंगळासारख्या एका समर्थ ग्रहाची सहानुभूती आपण गमावून बसला होता. ११ सप्टेंबरला तो आपल्या भाग्यस्थानी प्रवेश करताच त्याचे हार्दिक सहकार्य आपणास मिळू लागेल.

तुमच्या कित्येक महिन्यांतील सांपत्तिक, व्यावहारिक अडीअडचणी आता पूर्णांशाने दूर व्हायला लागतील. अनारोग्याची विवंचना मिटून जाईल, सांपत्तिक बाबतीतही आता केव्हाच काळजी करण्यासारखा प्रसंग उद्भवणार नाही.

या महिन्यात बदली बढतीचे योग निश्चितच येतील, प्रगतीकडे पावले पडू

लागतील, धार्मिक हेतून प्रवास घडेल. मंगल कार्याचे जवळजवळ निश्चित ठरेल.

दि. २ ते ९, १३ ते १९, २४ ते २८ या कालांत अनंत प्रगतीच्या घटना घडून येतील.

**मकर :** गेल्या २-३ महिन्याच्या मानाने हा सप्टेंबर महिना आपणांस काहीसा स्वास्थ्याचा–लाभाचा–प्रगतीचा ठरावा. विशेषतः दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य शुक्रादी अनेक ग्रह भाग्यस्थानी येणार असल्यामुळे आपल्या स्थगित कार्यांना गती मिळू लागावी.

पण मंगळ आठवा होणार आहे. यामुळे अपेक्षेप्रमाणे सारेच काही घडेल असे दिसत नाही. आरोग्य ठीक राहणार नाही. पैसा मिळेल पण त्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. हाती घेतलेल्या कामांत अपयश येणार नाही पण मिळणाऱ्या यशावर आपण प्रसन्न असणार नाही. असे या कालाचे स्वरूप जाणवेल.

दि. ३ ते ६, ९ ते १३, २१ ते ३० काही प्रमाणांत यश लाभावे.

**कुंभ :** अनेक ग्रह सप्तम–अष्टमांतून संचारू लागलेले आहेत. त्यांचा हेतू काही चांगला दिसत नाही. त्यातल्या त्यात प्रकर्षाने जाणवेल सातवा मंगळ. कामाचा ताण खूपच वाढेल, भागीदारीचे व्यवहार चिघळण्याचा संभव दिसू लागेल. उद्योग धंद्याचे स्वरूप काळवंडल्यासारखे जाणवायला लागेल.

पण एकटा गुरु या कोंडीतून बाहेर पडावयास मदत करील.

कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही पण अप्रसन्न भासू लागेल. विरोधक उठाव घेण्याचा प्रयत्न करू लागतील. मुख्यतः २२ सप्टबरच्या सूर्यग्रहणापासून अडीअडचणी वाढू लागतील. या महिन्यात दूरच्या प्रवासाचे टाळा.

१ ते ३, ९ ते १२, १६ ते २०, २७ ते ३० थोडेफार स्वास्थ्याचे दिवस हेच.

**मीन :** ११ सप्टेंबरला मंगळाचे षष्ठस्थानी आगमन घडताच तुमच्या मार्गातील अडीअडीचणी बऱ्याच प्रमाणांत दूर व्हायला लागतील. त्यामुळे साडेसातीचा ताण बराच कमी होईल. ९ सप्टेंबरच्या सूर्य–गुरू योगापासून व्यावसायिक वातावरण निश्चित सुधारू लागेल.

पण २२ सप्टेंबरच्या सूर्यग्रहणाचा तुमच्या कुटुंबियांच्याही आरोग्यावर बराच अनिष्ट परिणाम जाणवायला लागेल.

दुसऱ्या पंधरवड्यात फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका. आणि कोणाच्या मध्यस्थीत भाग घेऊ नका.

तात्पर्य हा महिना गेल्या २ महिन्यांच्या मानाने काहीसा अनुकूल असूनही अपेक्षेप्रमाणे स्वास्थ्य लाभलसे दिसत नाही.

दि. ३ ते ९, १३ ते १९, २४ ते २८ प्रयत्न थोडेफार यशस्वी व्हावेत.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise ; Regd. No. M H-649

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला,
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

प्रस्तावना : ना. ग. गोरे

मूल्य : सोळा रुपये

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात प्रसिद्ध होत आहे.

**राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणे २.**

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९, नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर**